ज्ञान प्रबोधिनीचे
कुमारांसाठी,
कृतिशीलता
जोपासणारे
मासिक!

छात्र प्रबोधन

सौर अग्रहायण, शके १९३५। वर्ष १४ अंक ३
मूल्य रुपये पंधरा

छात्र प्रबोधनतर्फे नावीन्यपूर्ण राज्यस्तरीय सांघिक स्पर्धा : २०१३-१४
(मराठी व इंग्रजी दोन्ही माध्यमांमध्ये)

एकाच शाळेतील, अथवा वेगवेगळ्या शाळांतील मित्रमैत्रिणींचा गट करून मोठ्या संख्येने या छात्र प्रबोधनच्या स्पर्धांमध्ये सहभागी व्हा. तुमच्यातल्या कल्पकतेला व विविध कलागुणांना व्यक्त होण्याची संधी द्या.

स्पर्धा इ.७ वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी असून त्यांना कोणतेही शुल्क नाही. सर्व स्पर्धा सांघिक आहेत.

❊ **'माझा गाव / शहर' याविषयावर स्लाईड शो (पी. पी. टी.) निर्मिती स्पर्धा** (३ जणांचा गट)

तुमच्या गावाचा इतिहास, भूगोल, निसर्ग, माणसे, संस्था, लोकजीवन, दर्शनीय स्थळे, व्यवसाय यापैकी एक वा अनेक वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी दाखविणारा तुमच्या गावाचा/शहराचा स्लाईड शो तयार करण्याची स्पर्धा

स्पर्धेचे तपशील – ● स्लाईडस्‌ची संख्या २५ ते ३० असावी. ● स्लाईडस् मराठीतून असाव्यात. त्यासाठी युनिकोड मराठी फॉण्टचा वापर करावा. ● शक्य तेथे स्लाईडस्‌ला फोटो, आवाज, व्हिडिओ क्लीप्सची जोड द्यावी.
● स्लाईडसाठी जे जे संदर्भ वापरले असतील (ज्यांची मदत घेतली असेल, पुस्तके, वेबसाईटस्, व्यक्ती इ.) त्यांची नावे शेवटच्या स्लाईडस्‌मध्ये लिहावीत. ● विषयाची निवड, स्लाईडस्‌ची गुणवत्ता, गावाचे वैशिष्ट्य दाखवणारे पैलू, वापरलेले संदर्भ, एकत्रित परिणाम व मांडणी यांद्वारे गुणांकन केले जाईल.

बक्षिसे – प्रथम : रु. ५००/–, द्वितीय : रु. ४००/–, तृतीय : रु. ३००/–

❊ **भारतीय भाषांमधील स्फुर्तिगीत समूह गायन स्पर्धा.** (५ ते ७ जणांचा गट)

स्पर्धेचे तपशील – ● आपल्या नोटेवर छापलेल्या मराठी, हिंदी, संस्कृत सोडून अन्य कोणत्याही भाषांमधील राष्ट्रभक्तीपर स्फुर्तिगीत असावे.
● स्फुर्तिगीत देवनागरी लिपीत लिहून त्याचा मराठी शब्दार्थ/भावार्थ/ रसग्रहण लिहायचा आहे. ● गटाने ते गाऊन त्याचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करावे व त्याची सीडी तयार करावी. ● लेखन, गायन मुलामुलींचे असावे. (साथ संगत मोठ्यांची चालेल.)
● साभिनय गीत सादर केल्यास १० गुण जास्तीचे मिळतील. ● गीताची निवड, त्याचा अर्थ व रसग्रहण, गायन व सादरीकरण यांच्या आधारे गुणांकन केले जाईल.

बक्षिसे – प्रथम : रु. ८००/– द्वितीय : रु. ७००/– तृतीय : रु. ५००/–

❊ **'तुम्हीच संपादक व्हा' हस्तलिखित स्पर्धा** (५ ते ८ जणांचा गट)

स्पर्धेचे तपशील –● हस्तलिखित ५० पृष्ठसंख्येचे असावे व ते दोन भागात करायचे आहे. ● एक भाग २५ पानांचा कोणत्याही एका विषयावर लिहिलेला असावा. ठरविलेल्या विषयावरचे विविध पैलू उलगडणारा असावा. विविध लेखन प्रकारांचे मिश्रण असणारा हा भाग असावा. ● दुसरा भाग २५ पानांचा संमिश्र असावा. त्याला कोणत्याही विषयाचे बंधन नाही. वैविध्यपूर्ण विषय व लेखन प्रकार यात असावेत. **दोन्हीपैकी कोणत्याही एका भागामध्ये खालील गोष्टींचा समावेश असावा.**

१. एकांकिका, २. वर्षविशेष – कवयित्री इंदिरा संत यांच्या जन्मशताब्दी निमित्त त्यांच्या पाठ्यपुस्तकाबाहेरचे कोणत्याही एका कवितेचे रसग्रहण **३. मुलाखत –** आपल्या परिसरातील एका प्रशासकीय अधिकाऱ्याची मुलाखत.
४. प्रतिभाशाली लेखन – कोणत्याही एका विषयावर १० × १० चे शब्दकोडे.
५. कल्पक विचार – नित्य वापरातील कोणत्याही एका वस्तूचे ५० उपयोग.

बक्षिसे – प्रथम : १,०००/–, द्वितीय : ८००/–, तृतीय : रु. ६००/–, उत्तेजनार्थ : रु. ४००/–

सर्व स्पर्धांची नोंदणी छात्र प्रबोधनच्या ईमेलवर अथवा पत्राद्वारे **दि. ३१ डिसेंबर २०१३** पूर्वी करणे आवश्यक
अधिक तपशीलासाठी मुख्य कार्यालयाशी संपर्क साधा.

विशेष संधी – क्रमांक प्राप्त हस्तलिखितात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना परस्पर सोयीनुसार कोणत्याही महिन्यातील ४ दिवस 'छात्र प्रबोधन' अंकाच्या संपादकीय कामाचा अनुभव घेण्याची संधी मिळेल. पहिल्या तीन क्रमांकांना पुस्तके/ सीडी रूपाने बक्षिसे दिली जातील. विशेष गुणवत्ता प्राप्त सर्वांना प्रशस्तिपत्रके!

सर्व स्पर्धांसाठीचे साहित्य पाठविण्याचा अंतिम दिनांक ३१ जानेवारी २०१४

छात्र प्रबोधन

सौर अग्रहायण, शके १९३५। वर्ष १४ अंक ३

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२) २५७ वा अंक, वर्ष २२ अंक ५

प्रकाशन दिनांक - १० अग्रहायण शके १९३५/१ डिसेंबर २०१३

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

• अंतरंग •

४.	**संवाद**	- महेन्द्र सेठिया
५.	कथा ... **अर्पितचे प्रसंगावधान**	- ईशान पुणेकर
७.	गणिती खुराक... **जादूचे चौकोन** - भाग १	- डॉ. वर्षा जोशी
९.	डोळस भटकंती... **कोकणातील अभ्यास सहल**	-प्रशांत दिवेकर
१०.	कविता... **नवं बळ**	- डॉ. सुमन नवलकर
११.	ललित... **समुद्राकाठची मुलं**	- रेणू दांडेकर
१३.	ललित... **आमचे स्नेहसंमेलन-आमचा सहभाग !**	- नीलिमा करमरकर
१५.	व्यि तिपरिचय... **सुयशची भरारी**	- सुयश जाधव
१९.	कथा... **साकव**	- शशिकांत पाटील
२१.	संवाद कौशल्य...६ **औपचारिक संवादाची पूर्वतयारी**	- स्मिता निरगुडकर
२४.	माहितीपर... **सफर कॅडबरी जगताची**	- कविता मेहेंदळे
२६.	कविता... **श्रममेव जयते**	- मुबारक शेख
	मलपृष्ठ पद्य... **देवी शारदा**	- स. सो. सुतार

याशिवाय - पक्षी जगत - पोपट ऊर्फ राघू - संजीव नलावडे (१२), ओळखा मी कोण?- डॉ. पुरुषोत्तम जोशी, (१७, २३), हसवा हसवी (२०),

तळटिपेतील ओळी भारतीय अवकाश संशोधन संस्था व त्यांच्यातर्फे झालेल्या यान व उपग्रह प्रक्षेपणासंदर्भात आहेत.

मुखपृष्ठाविषयी

डिसेंबर म्हणजे थंडीचा महिना. व्यायामाचा मोसम त्याचबरोबर आपल्या जिभेची चंगळही. शाळेत स्नेहसंमेलने, क्रीडादिनाची, सहलीची धामधूम ! सूर्य या सर्व गोष्टींनी विणलेली उबदार गोधडी जणू तुमच्यासाठी द्यायला उत्सुक झाला आहे. अशी या मुखपृष्ठामागील संकल्पना आहे.

– अभय पुरंदरे

• संपादक, प्रकाशक, मुद्रक •
महेन्द्र सेठिया

• कार्यकारी संपादक •
शिल्पा कुलकर्णी

• संपादक मंडळ •
शैलजा देशमुख,
नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे,
आश्लेषा महाजन

• मुखपृष्ठ व आतील चित्रे •
अभय पुरंदरे

• संपर्क पत्ता •
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९
संकेतस्थळ
www.chhatraprabodhan.org
ई-मेल
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

मासिकाची वर्गणी
वार्षिक: ₹ १८०, द्वैवार्षिक: ₹ ३४०,
त्रैवार्षिक: ₹ ५००,
दशवार्षिक: ₹ १,५००.
या अंकाची किंमत : ₹ १५
(पुण्याबाहेरील धनादेशासाठी - ₹ २० जादा, घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ४० जादा)

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही र कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

उराशी धरली मी आस, मजला प्रकाश दिसणार। काळोख्र आहे मागे-पुढे दाट, पण त्यातूनही मार्ग काढणार।।

छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!

प्रायोजक - डॉ.कीर्ती आपटे, पुणे - दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा.

संवाद

प्रतिसादी वाचन करणाऱ्या प्रिय प्रबोधकांनो,

'छात्र प्रबोधन'च्या दिवाळी अंकामुळे तुमची दिवाळीची सुट्टी नक्कीच समृद्ध करणारी झाली असेल, हो ना ! दिवाळी अंकाच्या शेवटच्या पानावरील प्रश्नावलीच्या आधारे अंक पुन्हा वाचा आणि 'खुल्या परीक्षा पद्धती' नुसार दिवाळी अंक उघडे ठेवून, तुम्ही त्या प्रश्नांची उत्तरे लिहा आणि द्या आमच्याकडे पाठवून. तुम्ही आधी वाचलेल्यापेक्षा हाच अंक तुम्हाला थोडा वेगळा भासेल. काही वेगळी वैशिष्ट्ये तुमच्या नव्याने लक्षात येतील. निव्वळ वेळ घालविण्यासाठी केलेल्या निष्क्रिय वाचनापेक्षा प्रतिसाद देण्यासाठी केलेले सक्रिय वाचन अधिक उपयोगी पडते. दीर्घकाळ लक्षात राहते. मग तो प्रतिसाद स्वत:शीच बोलून, त्यावर चिंतन-मनन करून, स्वत:च्या दैनंदिनीत त्याबद्दल जे वाटलं ते लिहून किंवा एखादे चित्र काढून तुम्ही देऊ शकता. कधी तो प्रतिसाद आपल्या भावंडांबरोबर, मित्र-मैत्रिणींबरोबर, आई-बाबा-शिक्षक यांच्याशी केलेल्या संवादातूनही व्यक्त होऊ शकतो. कधी हा प्रतिसाद संबंधित लेखकाला, अंकाच्या संपादकांना लिहून-बोलूनही तुम्ही देऊ शकता. आपल्याला जे भावलं- वेगळं वाटलं, ते इतरांना आवर्जून सांगा. यावर्षीच्या दिवाळी अंकातील ३-४ तरी लेखांना वरील कोणत्याही प्रकाराने तुम्ही आवर्जून प्रतिसाद द्यावा.

*२३ नोव्हेंबरच्या शनिवारी, संध्याकाळी छात्र प्रबोधनचे लेखक, चित्रकार, जाहिरातदार, प्रायोजक, हितचिंतक यांचा स्नेहमेळावा पुण्यामध्ये आयोजित केला होता. त्यामध्ये **'छात्र प्रबोधन योगदान, अपेक्षा व आव्हाने'** या विषयावर अनेकांनी आपापली मते मांडली. अंकातील चित्रे, मांडणी, सजावट अधिक आकर्षक असायला हवी असे कुणी सुचवलं, तर कोणी विद्यार्थ्यांना मानसिक-भावनिकदृष्ट्या अधिक सक्षम करणारे लेख असावेत असं सुचवलं. कोणी अंकातली रंजकता वाढवायला हवी असं सुचवलं तर कुणी अंकातील कृतिपर लेखांमधील कलाकृतींचे प्रदर्शन भरवावे असं सांगितलं. कुणी मराठी अंकात काही इंग्रजी पानांचाही समावेश करावा असं म्हटलं, तर कुणी अंकांवर आधारित अभिवाचनाचे, सादरीकरणाचे कार्यक्रम व्हावेत असंही सुचवलं. कुणी विज्ञान-तंत्रज्ञानातील मूलभूत संकल्पना आणि आधुनिक संशोधन यावर अधिक भर द्यावा असं म्हटलं, तर कुणी आयुष्य समृद्ध करणाऱ्या भाषेचं महत्त्व व भाषेची खोली वाढविण्यावर भर द्यायला सांगितलं. अनेक छान-छान मुद्दे स्नेहमेळाव्यात मांडण्यात आले. त्या सर्व मुद्द्यांवर ;छात्र प्रबोधनचे संपादकीय मंडळ विचार करेल आणि त्यानुसार अंकामध्ये आवश्यक ते बदलही करेल.*

पण हे सर्व विचार 'मोठ्या'लोकांनी मांडले. हे मासिक ज्यांच्यासाठी छापले जाते; म्हणजे तुम्ही सर्व कुमार वाचक, तुम्हाला छात्र प्रबोधनविषयी काय वाटतं? तुमच्या दृष्टीने छात्र प्रबोधनचं योगदान काय? तुम्ही खरंच मनापासून छात्र प्रबोधन वाचत असाल तर त्यातून तुम्हाला काय-काय मिळतं? समजा, छात्र प्रबोधन उद्यापासून बंद करायचं ठरवलं तर तुम्ही कशाकशाला मुकाल असं तुम्हाला वाटतं? जरा विचार करून कळवाल? त्याचबरोबर तुमचे शालेय शिक्षण, दूरदर्शन, संगणक, यांमधून जे तुम्हाला मिळत नाही असं काय तुम्हाला या अंकातून मिळतंय? (खरंच मिळतंय का?) किंवा अजून तुम्हाला काय मिळायला हवंय? तुम्ही सर्वांनी कर्तृत्ववान व्हावं असं 'छात्र प्रबोधन'ला मनापासून वाटतं. छात्र प्रबोधनमध्ये त्यासाठी अजून काय हवंय? तुमच्या छात्र प्रबोधनकडून काय अपेक्षा आहेत? थोडा वेळ काढून आवश्यकता वाटली तर मागचे अंक चाळून तुम्ही याविषयी लिहायचा प्रयत्न करा. असा विचार करून लिहायला तुम्ही आता पुरेसे मोठे झाला आहात. तेव्हा कंटाळा न करता जरूर लिहा. तुम्हाला हव्या त्या भाषेत, प्रामाणिकपणे लिहा, मोकळेपणाने लिहा. आमच्यासाठी ते फार महत्त्वाचे असणार आहे. 'मोठ्या' लोकांनी केलेल्या सूचनांपेक्षाही जास्त मोलाचं असणार आहे! तुमच्या सर्वांच्या या प्रतिसादातूनच छात्र प्रबोधनची पुढची वाटचाल अधिक दर्जेदार, तुम्हाला आनंद देणारी आणि तुमच्यातलं कर्तृत्व फुलवणारी होईल यात शंकाच नाही.

क्रीडा-स्पर्धा, स्नेह-संमेलने, सहली यांमध्ये जबाबदारी घेऊन मनापासून सहभागी व्हा! आणि त्यातल्या गमती-जमतीही जरूर कळवा. तुमच्या प्रतिसादाच्या प्रतीक्षेत...

तुमचा दादा,

(महेन्द्र सेठिया)

क्षितिजाच्या काळोखाला फुटे सुवर्णाचे पान। आकाशाच्या ओंजळीत पडे किरणांचे दान।।

राष्ट्रीय अंतराळ संशोधन समितीची स्थापना १९६२ -पहिले प्रमुख डॉ. विक्रम साराभाई

प्रायोजक - डॉ. संतोष काकडे, पुणे.

गाडी भरार वारं कापत होती. गाडीमध्ये अर्पित ताईबरोबर मागच्या बाजूला बसला होता. वाऱ्यामुळे त्याचे केस भुरभुरत होते. ताईच्या मांडीवर तिचं गोबऱ्या गालांचं बाळ होतं. त्या गालांना हात लावत अर्पितच्या त्याच्याशी गप्पा चालू होत्या. आज सुट्टी असल्यामुळे तो ताईकडे आला होता.

''शोन्या, हा तुझा छान छान मामा आहे. हा तुझे खूप लाड करणार,'' लीना लाडाने म्हणाली. हा त्याचा छान मामा नववीत होता.

लहानपणी लीनाने भावासाठी हट्ट केला होता, तेव्हा तिच्या आई-बाबांनी अर्पितला दत्तक घेतलं होतं. दोघांच्या वयात बारा वर्षांचं अंतर होतं. र ताचं नातं नसतानाही तिचा अर्पितवर खूप जीव होता. दोघांची एकदम गट्टी जमली होती. नंतर तिचं लग्न झालं. मग अर्पितला तिच्याशी फार बोलायला मिळायचं नाही.

''लीना, 'ए टू झेड' मध्येच जाऊया ना?,'' गाडी चालवणारे ताईचे यजमान त्यांचं बोलणं मध्येच तोडत म्हणाले.

त्यांचा आवाज ऐकताच अर्पित एकदम गप्प बसला. ताई यजमानांना मानेनेच 'हो' म्हणाली.

ताईचे यजमान मानाने मोठे, पैसेवाले, म्हणून अर्पित त्यांच्यासमोर दबून असायचा. अर्पित दत्तक असल्याने त्यांच्या मनात अर्पितविषयी एक प्रकारची अढीच होती. ते बरोबर असले की अर्पित जरा गप्पच असायचा.

हरीशने, ताईच्या यजमानांनी गाडी *मॉलच्या पार्कींगमध्ये* घेतली. तिथे गर्दी होती. त्यांनी गाडी अगदी पायऱ्यांजवळ लावली. वर जाण्यासाठी मोठमोठ्या आठ-दहा पायऱ्या होत्या.

गाडीमधून हरीशने फोल्डिंगची बाबागाडी बाहेर काढली. त्याचं सगळं काम राजेशाही थाटात असायचं. गाडीतलं सामान व्यवस्थित गाडीत होतं. ते तसंच ठेवून त्याने काचा वगैरे लावून घेतल्या.

'ए टू झेड' मॉल खूप मोठा होता. पायऱ्या चढून ते सगळे आत गेले. वर *पॅसेजमध्ये* हरीशने बाबागाडी उघडली. बाळाला त्यात ठेवले. ते टुकूटुकू इकडे-तिकडे पाहात होतं. आजची खरेदी त्याच्यासाठीच तर होती; पण त्याला काय त्याचं?

अर्पितने गाडी धरली व तो ती ढकलू लागला. लीनाने बाळासाठी लागणारे कपडे, स्वेटर्स, साबण,



अर्पितचे प्रसंगावधान

– ईशान पुणेकर

पावडर वगैरे खरेदी केली. तिची खरेदी चालू असताना अर्पित त्याच्या मापाचे शर्टस् पाहात होता; पण त्याने कशालाही हात लावला नाही किंवा तो काही बोललाही नाही.

लीनाने, अर्पितसाठी एक छानसा शर्ट घेतला. हरीशच्या चेहऱ्यावर सूक्ष्म आठी उमटली. पण तेव्हा तो काही बोलला नाही.

खरेदी संपली. सगळ्यात अगोदर हरीश बाहेर पडला. त्याच्या मागे बाबागाडी धरलेला अर्पित होता. लीना काऊंटरवर पैसे द्यायला थांबली.

आता त्यांना एका मोठ्या हॉटेलमध्ये जेवायला जायचं होतं. हरीशची त्याच्यासाठी घाई चालली होती. तो पायऱ्या उतरून खाली गेला. त्यानं कारचं दार उघडलं, तोच–

एक दांडगट, केसांमध्ये झिगझॅग आकाराचं हेअर बँड अडकवलेल्या तरुणाने हरीशला ध का दिला. हरीश खाली पडला. त्या तरुणाने वेळ न दवडता पटकन सीटवरची मोठी सॅक उचलली. हरीशने ते पाहताच, पडल्या पडल्या त्या तरुणाचा पाय पकडला. त्या तरुणाने चिडून त्याच्याजवळचा चाकू हरीशवर उगारला...

पायऱ्यांवर ताईची वाट पाहात असलेल्या अर्पितनं ते सारं पाहिलं. त्या तरुणाच्या ताकदवान, वेगवान हालचाली आणि त्याच्या हातातला चाकू पाहून अर्पितच्या मनात जणू वीज चमकली.

आणि दुसऱ्या क्षणाला अर्पितने गाडीतून बाळाला उचलून घेतलं. त्या बाबागाडीला त्याने एक जोरदार लाथ मारली. ती गाडी धडधडत खाली जाऊन त्या तरुणाच्या अंगावर जोरात कोसळली ! त्या ध याने तो तरुण धडपडला. हे पाहून हरीशने त्याचे पाय परत धरून ठेवले. त्यामुळे तो तरुण तोंडावरच आपटला. त्याचा चाकू उडून बाजूला पडला. हे सगळं अगदी काही क्षणांत घडलं होतं.

बाळाला सावरत, उड्या मारत अर्पित खाली उतरला. त्याने एका हाताने चाकू उचलला. चाकू अर्पितच्या हातात गेल्याने तो तरुण सटपटला. एव्हाना अर्पित जोरात 'चोर चोर!'ओरडायला लागला.

सुरक्षारक्षक व इतर लोक तिथे गोळा झाले. त्यांनी चोराला पकडलं. तेवढ्यात ताई बाहेर आली होती. तिथे काय घडलंय याची तिला कल्पनाच नव्हती.

हरीश सावरला होता. त्याने अर्पितला जवळ घेतलं. अगदी पहिल्यांदाच! गाडीजवळ आलेल्या लीनाला हरीशनं घडलेला प्रसंग सांगितला. तिने अर्पितला जवळ घेतलं. तिच्या अर्पितने हरीशला वाईट प्रसंगातून वाचवलं होतं. तिचं अर्पितबद्दलचं कौतुक अश्रूंच्या रूपानं डोळ्यांत दाटून आलं.

मग ते एका मोठ्या हॉटेलमध्ये जेवायला गेले. तिथे बसल्यावर लीना म्हणाली, ''सॅकमध्ये यांचा ऑफिसचा लॅपटॉप, महत्त्वाची कागदपत्रं व पैसेदेखील होते.''

''पण हा अर्पित होता ना, तुझा धाडसी व प्रसंगावधानी छोटा भाऊ!'', हरीष कौतुकानं म्हणाला. मग मागे वळून तो बाळाला म्हणाला, ''ए गुंड्या बघितलंस नं, तुझा मामा कित्ती भारी आहे; शूर आहे ते. तुलासुद्धा त्याच्यासारखंच शूरवीर व्हायचंय.''

या अनपेक्षित कौतुकामुळे अर्पित बावरून गेला होता. पण हरीशने अर्पितची दखल घेतल्यामुळे तो थोडासा सुखावलाही होता.

हरीश म्हणाला, ''मी अर्पितला एक छान जीन्स् आणि बूटसुद्धा घेणार आहे. अर्पितनं दाखवलेल्या धाडसाचं, प्रसंगावधानाचं बक्षीस त्याला नको का मिळायला? नंतर आईकडे जाऊया. कधी एकदा त्या दोघांना अर्पितचा पराक्रम सांगतोय असं मला झालंय.''

'हो-हो', लीना आनंदाने म्हणाली. उत्तेजित झालेल्या हरीशकडे ती आश्चर्याने पाहातच होती.

अर्पित किंचित लाजला होता. त्याला फारच आनंद झाला होता. नवीन कपडे व बूट मिळणार याचा नाही; तर ताईचे यजमान त्याच्याशी मनापासून बोलले, याचा!

•••

– ईशान पुणेकर
१५५ परमार अपार्टमेंट, रास्ता पेठ,
पुणे 411011
ishaanpunekar @yahoo.com

गणिती खुराक...

जादूचे चौकोन (मॅजिक स् वेअर्स)

– डॉ. वर्षा जोशी

छात्र प्रबोधन दिवाळी विशेषांकात (सौर कार्तिक/नोव्हेंबर) तुम्हाला 'जादूचे चौकोन' तयार करायला सुचवलं होतं. केला का प्रयत्न? त्यामध्ये विचारलेल्या क्रमांक ४ च्या जादूचा चौकोन कसा तयार करायचा याविषयी आपण या लेखात जाणून घेणार आहोत.

वेगवेगळे गुणधर्म असलेले सम, विषम क्रमांकाचे जादूचे चौकोन असतात. ते तयार करण्यासाठीच्या वेगवेगळ्या प्रणालीही आहेत. त्या आपण पाहणारच आहोत. त्याचबरोबर कोणते जादूचे चौकोन तयार करण्यात अजून यश मिळालं नाही हेही पाहणार आहोत. जादूचे चौकोन आता फ त करमणुकीचा विषय राहिलेला नाही, तर तो एक संशोधनाचा विषयच झाला आहे.

कित्येक वेळा असं होतं की आपल्याला नेहमीचा अभ्यास, नेहमीच्या गोष्टी यांचा कंटाळा आलेला असतो. अशा वेळी गणितातली कोडी सोडवायला मजा येते. वेळ छान जातो आणि मेंदूला खाद्य मिळतं. मेंदू पुन्हा नेहमीच्या गोष्टी करण्यासाठी ताजातवाना होतो. गणितातली अशी आणखी एक संकल्पना जी आपला वेळ मजेत घालवते आणि मेंदूला खाद्य पुरवते ती म्हणजे जादूचे चौकोन अर्थात् *मॅजिक स्क्वेअर्स.* जे विद्यार्थी स्पर्धा परीक्षांना बसत असतात त्यांना बऱ्याच वेळा बौद्धिक क्षमता–*मेंटल ॲबिलिटी* या नावाचा पेपर द्यावा लागतो. त्यामध्ये एक भाग *मॅजिक स्क्वेअर* म्हणून असतो. साधारणपणे तीन ओळी आणि तीन स्तंभ अशी यांची रचना असते. त्यामध्ये नऊपैकी आठ अंक भरलेले असतात आणि नववा शोधून योग्य त्या पर्यायावर खूण करायची असते. खरं तर या चौकोनांना *मॅजिक स्क्वेअर* म्हणणं चुकीचं आहे; कारण गणितात ज्याला *मॅजिक स्क्वेअर* म्हणतात त्याचे निकष वेगळेच आहेत. त्यामध्ये प्रत्येक ओळीतील, प्रत्येक स्तंभातील आणि प्रत्येक कर्णातील अंकांची बेरीज समान असते. या गणितातल्या *मॅजिक स्क्वेअर्सशी* आपला चांगला परिचय झाला तर स्पर्धात्मक परीक्षेतल्या *मॅजिक स्क्वेअर्सवरची* उदाहरणं सोडवणं सोपं होऊ शकतं. शिवाय ही संकल्पना आपल्या मनातल्या अनेक कल्पनांचे दरवाजे उघडू शकते.

जादूचे चौकोन तयार करण्यासाठी वेगवेगळ्या प्रणाली आहेत. आपण यानंतर पुढच्या लेखांमधून वेगवेगळ्या क्रमांकांचे म्हणजेच विषम क्रमांकांचे (३, ५, ७ वगैरे), चारच्या पटीतल्या सम क्रमांकांचे (४, ८, १२, १६ वगैरे) आणि चारच्या पटीत नसलेल्या सम क्रमांकांचे (६, १०, १४ वगैरे) जादूचे चौकाने तयार करण्यासाठी असलेल्या सोप्या प्रणाली शिकणार आहोत. त्या वापरून कोणत्याही क्रमाचा जादूचा चौकोन तयार करता येईल. संगणकामध्ये या प्रणाली वापरूनही असे जादूचे चौकोन तयार करता येतील. सुडोकू आणि जादूचे चौकोन यांचा तुलनात्मक अभ्यासही आपण करू. प्रख्यात भारतीय दिवंगत गणिती श्रीनिवास रामानुजन यांच्या शंभराव्या जयंतीचं वर्ष नुकतंच पार पडलं. त्यांच्या जन्मदिवसासंबंधीचा जादूचा चौकोनही आपण पाहाणार आहोत.

जादुई चौकोन – इतिहास (भाग – १)

चीनमधल्या यलो नदीमध्ये सापडलेल्या कासवाच्या पाठीवर जादूच्या चौकोनाची रचना होती. आपल्याकडे खजुराहो येथील पूर्व बाजूच्या जैन मंदिराच्या गाभाऱ्याच्या भिंतीवर एक चार क्रमाचा जादूचा चौकोन कोरलेला सापडला आहे.



कासवाच्या पाठीवरील जादूचा चौकोन

खजुराहो येथील मंदिरातील जादूचा चौकोन

१	५	९	१३
२	६	१०	१४
३	७	११	१५
४	८	१२	१६

आकृती ४.१

१	५	९	१३
२	६	१०	१४
३	७	११	१५
४	८	१२	१६

आकृती ४.२

१	१२	८	१३
२	६	१०	१४
३	७	११	१५
४	९	५	१६

आकृती ४.३

१	१२	८	१३
१५	६	१०	३
१४	७	११	२
४	९	५	१६

आकृती ४.४

या लेखात आपण ४ क्रमांकाचे जादूचे चौकोन तयार करण्याच्या प्रणाली पाहाणार आहोत. प्रथम ४ क्रमांकाच्या जादूच्या चौकोनाकडे वळूया. यासाठी आपण ४ ओळी व ४ स्तंभ अशा रचनेमध्ये प्रथम प्रत्येक स्तंभांमध्ये ४ अंक असे १ ते १६ अंक ओळीने लिहूया. आकृती ४.१ पाहा

आता आपण मधल्या रेषांनी दाखविलेल्या चौकोनातले अंक म्हणजे ६, १०, ७ आणि ११ आणि चार कोपऱ्यातले ठळक रेषांनी दाखविलेल्या चौकोनातले अंक म्हणजे १,४,१३ आणि १६ या सर्वांना आहेत तिथेच ठेवणार आहोत. त्यांना अजिबात ध का लावणार नाही. आकृती ४. २ पाहा. आता सगळ्यात खालच्या म्हणजे चौथ्या ओळीतील दोन अंक म्हणजे ८ व १२ यांना सगळ्यात पहिल्या ओळीत पण उलट्या क्रमाने लिहू. आणि पहिल्या ओळीतले अंक ५ व ९ यांना चौथ्या ओळीत उलट्या क्रमाने लिहू. असं केलं की आकृती ४.३ मधील चौकोन येतो. आता पहिल्या स्तंभातील दोन अंक २ व ३ यांना चौथ्या स्तंभामध्ये उलट्या क्रमाने तर चौथ्या स्तंभातील दोन अंक १४, १५ हे पहिल्या स्तंभामध्ये उलट्या क्रमाने लिहू. असं केलं की आपल्याला आकृती क्र. ४.४ मधील जादूचा चौकोन मिळतो. आता या चौकोनातील प्रत्येक ओळीतील अंकांची बेरीज किती येते? तसेच प्रत्येक स्तंभातील अंकांची बेरीज करा. बेरीज ३४ आली का? तसेच दोन कर्णांमधील अंकाची बेरीज ३४ आली का? याचा अर्थ असा, की आकृती ४.४ मधील चौकोन हा ४ × ४ म्हणजे ४ क्रमाचा जादूचा चौकोन आहे. या जादूच्या चौकोनाची जादूची बेरीज एका सूत्राप्रमाणे आपल्याला मिळेल. (जादूच्या बेरजेचे सूत्र = $n(n^2+1)/2$, n = जादुई चौकोनोचा क्रम) या सूत्राप्रमाणे ही बेरीज = ४ (४² + १) /२ = २ × (१६ + १) = २ × १७ = ३४

आता याच पद्धतीचा वापर करून ८× ८ म्हणजेच ८ क्रमाचा जादुई चौकोन तयार करता येईल का? प्रयत्न करा आणि कृतीसह आमच्याकडे पाठवा. तुम्हाला त्यासाठी खास बक्षीस!

•••

– **डॉ. अरुण जोशी, डॉ. वर्षा जोशी,** फ्लॅट नं. २०१, 'रुणवाल सान्निध्य', ५० प्रशांत सोसायटी, पौड रस्ता, कोथरूड, पुणे-३८

छात्र प्रबोधनचा दिवाळी अंक केंद्रावरून नेलात ना?

छात्र प्रबोधनचे वितरण असलेली गावे खाली दिली आहेत. आपण त्यापैकी कोणत्या गावात राहात असाल तर आपला अंक तेथील केंद्रावरून घेऊन जावा. या गावांव्यतिरि त अन्य गावांमधील सभासदांचे दिवाळी अंक पोस्टाने पाठविले आहेत. केंद्रांचे पत्ते, दूरभाष क्रमांक दिवाळीच्या आधीच्या अंकात दिले आहेत. अन्यथा छात्र प्रबोधनच्या कार्यालयात दूरभाष करून माहिती मिळवावी.

१. पश्चिम मुंबई : बोरीवली, विलेपार्ले, बांद्रा, गिरगाव, चेंबूर, विरार-वसई, पालघर, दादर, अंधेरी **२. मध्य मुंबई, ठाणे :** ठाणे, डोंबिवली, कल्याण, अंबरनाथ, बदलापूर **३. रायगड, नवी मुंबई :** खोपोली, अलिबाग, नागाव, नागोठणे, मुरुड, देवगड, महाड, रसायनी, पनवेल, सानपाडा, वाशी
४. रत्नागिरी, सिंधुदुर्ग : रत्नागिरी, पावस, चिपळूण, गुहागर, राजापूर, खेड, कुडाळ, सावंतवाडी, लांजा कणकवली, तळेरे **५. गोवा :** फोंडा, मार्दोळ, वास्को, परवरी, म्हापसा, डिचोली **६. कोल्हापूर :** कोल्हापूर, इचलकरंजी, कुरुंदवाड, हुपरी, महागाव **७. सांगली :** सांगली, तासगाव, ३२ शिराळे, कडेगाव, इस्लामपूर, मिरज **८. सातारा :** सातारा, कोरेगाव, कराड, उंब्रज, खंडाळा, पाटण **९. सोलापूर :** सोलापूर, पंढरपूर, मोहोळ **१०. अहमदनगर :** अहमदनगर, संगमनेर, कोपरगाव, शिर्डी, कर्जत, पारनेर **११. उत्तर महाराष्ट्र :** नाशिक, बोलठाण, मालेगाव, धुळे, देऊर बु।।, साक्री, शिरपूर, दोंडाईचा, नंदूरबार, शहादा, जळगाव, अमळनेर, भडगाव, चोपडा, चाळीसगाव, भुसावळ **१२. मराठवाडा :** औरंगाबाद, कन्नड, जालना, बीड, गेवराई, अंबाजोगाई, माजलगाव, धाराशिव, हराळी, लातूर, परभणी, सेलू, वसमतनगर, नांदेड **१३. विदर्भ :** नागपूर, अकोला, वाशीम, अमरावती, वर्धा, यवतमाळ, उमरखेड, चंद्रपूर, वरोरा **१४. पुणे :** पुणे, निगडी, चिखली, साळुंब्रे, शिवापूर, इंदापूर, चाकण, शिरुर, बारामती, सासवड, भोर

आता इथे विज्ञानाची उजाडे पहाट। नव्या माणसाची इथुनी निघे पायवाट।।

अंतरीक्ष आयोग (स्पेस कमिशन) स्थापना - **१ जून १९७२**

प्रायोजक - श्री. सुधीर विष्णू दफ्तरदार, पुणे.

कोकणातील अभ्यास सहल

– प्रशांत दिवेकर

'सहल म्हणजे मौजमजा', हे सोप्पं गणित आपल्या मनात असतं. पण सहलीचं नियोजन आपलं आपण केलं, तर खूप नव्या गोष्टी शिकता येतात, सहल अर्थपूर्ण होते आणि आपला आनंद द्विगुणित होतो. असाच एक बोलका अनुभव वाचूया.

परवा सहज जुन्या वह्या, कागदपत्रे पाहत असताना एक जुने सहलवृत्त सापडले. दहा वर्षांपूर्वीच्या आमच्या सहलीच्या वेळी केलेल्या डायरीतील नोंदी चाळता चाळता मन आठवणीत मागे गेले.

...मे महिन्यातील दहावीचे जादा तास चालू झाले. तेव्हा, एके दिवशी रत्नागिरीच्या 'गोगटे जोगळेकर महाविद्यालया'चे प्रा. सुरेंद्र ठाकूरदेसाई ह्यांचा 'कोकणातील भौगोलिक वैशिष्ट्ये' या विषयावर *स्लाईड शो* होता. *स्लाईड शो* नंतरच्या प्रश्नोत्तर व गप्पात पाठ्यपुस्तकात अभ्यासलेली समुद्र खाडी आदी भौगोलिक वैशिष्ट्ये जी सरांनी *स्लाईडमधून* दाखवली होती ती पाहण्यासाठी सुरेंद्र सरांबरोबर कोकण अभ्यास सहलीला जायचे ठरवले. 'सहलीची तयारी तुमची तुम्ही करणार असाल तर सहलीला परवानगी आहे', असे प्राचार्यांनी सांगितले.

मग काय रोज सहलीविषयीच चर्चा! किती दिवस जायचे? केव्हा? कोणत्या मार्गाने? बरोबर काय काय न्यायचे? खर्च किती? मु काम कुठे करायचा? असे अनेक प्रश्न निर्माण झाले. शेवटी सरांनी एक बैठक घेऊन कामांच्या याद्या केल्या व आमचे गट करून कामे वाटून दिली. संपर्काचे फोन करणे, भेटींच्या वेळा ठरवणे इ. ट्रॅव्हल एजंटना भेटून कमी दरात चांगली गाडी कोणाकडे मिळेल, यांसाठी हेलपाटे घालून बस ठरवली. सर्व उरकता उरकता सहलीचा दिवस जवळ येत होता.

पहिल्या दिवशी ताम्हिणी घाटातून कोकणात उतरताना वाटेत ताम्हिणीचे सुंदर जंगल लागले. या घाटात एक प्रचंड घळई (गॉर्ज) आहे. घाट उतरत असताना **सह्याद्री पर्वतरांगा, लाव्हाचा थर, खडकांचे विविध प्रकार पाहायला मिळाले.**

कुडावळ्याला जाताना वाटेत सावित्री नदीची खाडी व मंडणगडचे पर्वतांतर्गत पठार लागले. कुडावळे येथे निसर्ग अभ्यासक दिलीप कुलकर्णी यांच्याबरोबर त्यांच्या घराजवळ असलेली **देवराई** पाहिली. **निसर्ग संवर्धन** व **पर्यावरण समस्यांवर** त्यांच्याशी झालेल्या गप्पांमुळे मजा आली. देवराईत निटम (अनावृत्तबिजी वनस्पती), हिरडा, बेहडा, सावर, कुडा, ऑर्किड, नेचे, दगडफूल, ब्राकेट फंगस् यांसारख्या विविध वनस्पती, प्रचंड वेली पाहता आल्या. **जंगल परिसंस्थेची** ओळख झाली.

वाटेत आम्ही पन्हाळे (काजी) येथील प्राचीन लेणी पाहण्यास गेलो. तो एक लेण्यांचा समूह आहे व त्यावर बौद्धपंथ, नाथपंथ, गणेश पंथ आदींचा प्रभाव जाणवतो. दापोली येथील श्री. विष्णू सोमण यांच्यासोबत **लेण्यांचे वास्तुशास्त्र** अभ्यासण्यात, लेण्यातील विविध शिल्पांत कोरलेले महाभारत, रामायण आदीतले प्रसंग ओळखण्यात आम्ही रंगून गेलो होतो. या लेण्यांजवळून कोटजाई नदी वाहते. तिच्या काठाने हिंडताना **नदीच्या अवस्था, खनन, संचयन कार्य** आदींचा अभ्यास करता आला.

रात्री विश्रांतीपूर्वी दिवसभरात **पाहिलेल्या गोष्टींची उजळणी, टिपणे/नोंदी, नकाशे; रेखाटने पूर्ण करणे, गोळा केलेले नमुने योग्य प्रकारे साठविणे** आदी कामे तित याच उत्साहात केली.

दुसऱ्या दिवशी पानवळ येथील कोकण रेल्वेचा पूल पाहिला. आधुनिक वास्तुशास्त्राचा हा अप्रतिम नमुना आहे. गाडी जाताना पूल हादरताना अनुभवले आणि भौतिकशास्त्रातील नियम पहिल्यांदाच समजला. लोटे परशुराम येथील मंदिर पाहिले. वाटेत वाशिष्ठी नदीची

खाडी लागली. खारफुटी वनस्पती, भरती ओहोटीचा खाडीवर होणारा परिणाम आदी गोष्टींची माहिती झाली. गणेशगुळ्याच्या पुळणीवर हिंडताना किनाऱ्यांचे प्रकार, समुद्रकडा, तरंगघर्षित मंच, लाटा, समुद्राचे संचयन, विविध समुद्री प्राणी व वनस्पती इ. गोष्टी पाहिल्या.

सकाळी लवकर उठून खास कोकणात असतात अशा देवळात उपासना केली व नंतर नारळी, पोफळी, आंबा, मिरी, लवंग, दालचिनी, जाम, रातांबा आदी वनस्पती पाहिल्या. रत्नागिरी येथे रत्नदुर्ग येथील सागरी गुहा पाहिली. रत्नागिरीच्या पुळणीवरून हिंडताना समुद्रामुळे होणारी धूप रोखण्यासाठी मानवाने केलेले विविध प्रयत्न समुद्राने कसे विफल केले हे जाणवत होतं. नंतर आम्ही लावगण येथील बंदर पाहण्यास गेलो. बंदरात नांगरलेल्या मोठ्या बोटीवर छोट्या होडीतून जाऊन दोराच्या शिडीच्या साहाय्याने बोटीवर चढलो. बोटीवर इंजिनरूम, डेक, रडार यंत्रणा आदी गोष्टी बघितल्या. नंतर लावगण बंदराच्या निर्मितीसाठी झटणारे व्यवस्थापनप्रमुख श्री. दिलीप भटकर यांच्याशी झालेल्या गप्पांतून आम्हाला एका ध्येयवेड्या व्य तीचा परिचय झाला. लावगण हे एक खाजगी बंदर असून या बंदराचे एक वैशिष्ट्य म्हणजे हे भारतातील एकमेव बंदर आहे की जेथे मुलीदेखील जहाज दुरुस्तीचे काम करतात.

सहल संपवून पुण्यात आल्यावर आमचा पुढचा आठवडा सहलीचा अहवाल लिहिणे, अध्यापक, वर्गमैत्रिणींसमोर सहलीचे फोटो सांगून माहिती सांगणे यात कसा संपला, हे कळलेच नाही. खरंच, या तीन दिवसांच्या सहलीत नियोजन कसे करायचे, निसर्गात हिंडत असताना कोणत्या गोष्टी बघायच्या, कशा बघायच्या, नोंदी कशा ठेवायच्या आदी गोष्टींची तोंड ओळख झाली.

आजही एखाद्या सहलीचं नियोजन करताना या गोष्टी नकळत उपयोगी पडतात.

•••

– प्रशांत दिवेकर

ज्ञान प्रबोधिनी, ५१४ सदाशिव पेठ, पुणे – ३०

नवं बळ



माझे मित्र चालायचे, धावायचे, खेळायचे
'मलाच का कुबड्या?' मन तेव्हा प्रश्न विचारायचे.
हिमालयाची शिखरं, बागेमधली हिरवळ
यांचा स्पर्श कसा असेल? मनात उठायची कळ
क्रिकेट, फुटबॉल, जिम्नॅस्टि स पाहून टी.व्ही. वर,
प्रकर्षाने जाणवे 'त्यांच्या' माझ्यामधलं अंतर.
लग्नाच्या वरातीत नाचणारी मुलं पाहून
टाकावीशीच वाटायची खिडकी बंद करून
कधी कामवाली नसे, आईवरच पडे काम
तेव्हा मनात टोचायचा माझा नुसता आराम.
वाटे, कधी जादू होऊन गळून पडतील कुबड्या?
दोन पायांवर चालेन, धावेन, नाचेन, मारीन उड्या.
तेवढ्यात नवा दृष्टिहीन मित्र वर्गात आला,
आत्मविश्वास पाहून त्याचा, वर्ग चकित झाला.
'मला निदान दिसतंय तरी,' गेली माझी मरगळ.
त्याचं दु:ख पाहून आलं कुबड्यांत नवं बळ.

– डॉ. सुमन नवलकर

५/२० ज्योती बिल्डिंग, प्लॉट न. ४३/४५, बरकत अली दर्गा मार्ग, वडाळा (पूर्व) मुंबई ४०००३७

अखेर हे सारं घडतं, केवळ काही शिकण्यासाठी। आपण मात्र चुकत असतो पुन्हा पुन्हा शिकण्यासाठी।।

PSLV-C-8(ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपण यान) – **२३ एप्रिल २००७** (इटलीचे एजाइल व इस्रोचे एडवास्ट एवियोनि स मॉड्यूल)

प्रायोजक – श्री. संदीप जगधने, पुणे.

समुद्राकाठची मुलं

– रेणू दांडेकर



आपल्याला समुद्र बघायला आवडतो; पण लांबून! लाटा उसळल्या की अंगावर काटा येतो. एखादी मोठी लाट आली तर आपली घाबरगुंडीही उडते; मग समुद्रात पोहणे तर सोडाच. समुद्राकाठची मुलं मात्र कमालीची धाडसी असतात. कोकणात राहणाऱ्या माणसाला समुद्राबद्दल काहीच वाटत नाही. समुद्रकाठाने गाडी निघाली तरी लोकं समुद्राकडे बघतातच, असं नाही. जी गोष्ट रोजची, ती नसते नवलाची!

अशा समुद्रकाठी राहाणारी काही मुलं आमच्या शाळेत येतात. वसतिगृहात राहतात. रोज समुद्राशी नातं असणाऱ्या मुलांना माशांशिवाय कसं चैन पडणार? समुद्राच्या काठावरच ही मुलं लहानाची मोठी होतात. उधाणलेल्या समुद्राची त्यांना भीती वाटत नाही की समुद्रात खेळायचीही भीती वाटत नाही.

चालायला नुकतंच शिकलेलं मूलही लाटांवर झोके घेतं. ही त्यांची ताकद आहे. त्यांचं सगळं जगणं म्हणजेच धोका असतो. हा धोका पत्करायची सवय त्या मुलांना लहानपणापासून असते. वडील मच्छिमारी करण्यासाठी कित्येक दिवस समुद्रात असतात. दूरवर प्रवास करतात. ऋतूंचं, दिशांचं त्या मुलांना चांगलं भान असतं. या मुलांना पुस्तकं वाचता येत नाहीत; पण समुद्र पाठ असतो त्यांना! ही मुलं भरती–ओहोटीच्या फ त व्याख्या नाही पाठ करत. समजा तृतीया ही तिथी असेल, तर भरती किती वाजता येणार याचं गणित तुम्ही कसं बांधणार? तेव्हा ही मुलं पटकन पाऊणकी म्हणतात. पाऊणकी त्यांना १४ पर्यंत म्हणजे १४ पावणे पर्यंत म्हणता येते. तीन पावणे सव्वादोन म्हणजे सव्वादोनला भरती पूर्ण. पुढे २० मिनिटे 'समा' म्हणजे पाणी स्थिर. मग ६ तास ओहोटी. पुन्हा पाणी स्थिर. हे त्यांना अचूक मोजता येतं.

एकदा आम्ही समुद्राच्या काठावर होतो. येणारी लाट मी पाहात होते. सगळ्या लाटा काठाशी येत नव्हत्या. विरून जात होत्या. पण कोणती लाट फुटणार हे ती मुलं न की सांगू शकत होती. दूरवरून येणाऱ्या लाटेचा आवेग त्यांना ओळखता येत होता. खरं तर मला त्याक्षणी वाटून गेलं आपण जे धडे, कविता, विज्ञान शिकवतो त्यापेक्षा त्या मुलांचं जगणं ज्या समुद्राशी निगडित आहे त्यासंबंधी यांना काही कौशल्य शिक्षण देता आलं तर? मुलांना होड्या बांधता येतात, त्यांना समुद्रात होड्या लोटता येतात, कुठे मासे मिळतील हेही त्यांना ओळखता येते. त्याबाबत फ त माहिती नाही तर अचूक ज्ञान त्या मुलांना आहे.

त्यांना औपचारिक शिक्षण का

आवडत नसेल? सहजतेने आपल्या जीवनशैलीला सुधारता येतील अशा गोष्टी त्यांना कशा सांगता येतील?

मध्यंतरी एक मुलगा आमच्या शाळेत नव्याने दाखल झाला. पण बरेचदा तो गैरहजर असायचा. आमचे शिक्षक त्याच्या घरी गेले. वेळ संध्याकाळची होती. त्या दिवशी आषाढी एकादशी होती. खरंतर सर्व मंडळी विठ्ठलाच्या मंदिरात होती. भजनाचा आवाज येत होता. शिक्षकांना पाहून सर्वजण भजन म्हणायचे थांबले. मुलाचे वडील देवळातून बाहेर आले. म्हणाले,

''मुलगा दर्यावर आसंल. चला बघू...'' मुलगा खरंच समुद्रावर होता. मुलगा लाटांवर खेळत होता. वडील सांगत होते, ''आवं गुर्जी, हे कारटं खाडी पवून जातं. त्याला तेव्हा कुठून बळ येतं देवाला ठावकी. आवं, एकदा तर पांढऱ्या पुठ्ठ्याचं (थर्माकोल) यानं कायतरी बनवलं नि गेला की आत दर्यात. कुणीतरी मला सांगितलं तवा आमच्या भाऊबंदांनी दर्यात होऱ्या लोटल्या नि त्येला जबरदस्ती बाहेर काढला...''

शालाबाह्य ठरणारा हा मुलगा शाळेत आला तेव्हा त्याला 'बोलतं' करण्याचं माझ्यासमोर आव्हान होतं. खाडी पोहणं हा त्याचा छंद होता. त्या मुलाकडे पाहून त्याच्याकडे असलेल्या एवढ्या ताकदीचा अंदाजही येत नव्हता. माझ्या मनात आलं, 'हाच जर शहरातला मुलगा असता तर अमूक इतकं *कि.मी. स्वीमिंग* केलं म्हणून किती कौतुक झालं असतं !'

याला कसं घडविणार आहोत आपण ! पढीक पंडित की अनुभवजन्य शिकणारा? त्याच्या दृष्टीनं खाडी हे 'धाडस' नव्हतं, तर ते 'सहज' होतं. आम्ही मात्र सगळ्या घटना ऐकून थ क झालो होतो.

असे कितीतरी गुणवान विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रात पराकोटी गाठलेले असतात. पण शेवटी ही रानफुलं. रानफुलांचीच आत्ममग्नता असते यांच्यात!

खाडी पोहून जाणं ही साधी गोष्ट नाही, समुद्रात बिनधास्तपणे थर्माकोल जोडून तरंगणं हीदेखील साधी गोष्ट नाही. चौथीतून पाचवीत गेलेला मुलगा हे सगळं सहज करतो. त्यात त्याला काहीच वाटत नाही. हीच 'सहजता' खूप छान असते. कदाचित ही सहजता चार भिंतीत नसते म्हणून तर ही मुलं कंटाळत असतील का शाळेला!

●●●

– रेणू दांडेकर

renudandekar@gmail.com

पक्षी जगत

भारतीय वंशाचा युरोपीय रहिवासी – पोपट उर्फ राघू

मळ्याभोवती गोफ असणारा हिरव्यागार रंगाचा पोपट उर्फ राघू हा भारतात सर्वदूर दिसणारा पक्षी. शेती-भाती पासून मनुष्यवस्तीपर्यंत सर्वत्र त्याचा वावर. हा भारतीय पक्षी आता युरोपातल्या अनेक मोठ्या शहरांमध्ये स्थिरावला आहे. पन्नास-शंभर वर्षांपूर्वी पाळण्यासाठी युरोपिय लोकांनी भारतातून हे पोपट तिकडे नेले. यातले काही पोपट पिंजऱ्यातून पळून गेले वा सोडून दिले गेले. तिथल्या थंड हवामानाशी त्यांनी जुळवून घेतले. भिंतींच्या भोकात/बीळात घरटी बांधण्याची सवय त्यांना फायद्याची ठरली; विशेषत: थंडीपासून बचाव करायला. फ्रान्स, जर्मनी आणि इटलीतील अनेक मोठ्या शहरांमधून आपले पोपट दिसतात. ते आता तिकडचेच रहिवासी आहेत!

– संजीव नलावडे, शिवतीर्थनगर, कोथरुड, पुणे

आमचे स्नेहसंमेलन–आमचा सहभाग !

– नीलिमा करमरकर

थंडीची चाहुल लागली की शाळाशाळातून स्नेहसंमेलनाचे वारे वाहू लागतात. संमेलनात काय काय करायचे याची चर्चा सुरू होते. पण नेहमी प्रश्न पडतो की, शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याचा त्यात सहभाग असतो का? का बहुतांश विद्यार्थी फ त प्रेक्षकाची भूमिका बजावत असतात.

नुकतंच सौरभच्या शाळेतील स्नेहसंमेलनाचा विविध गुणदर्शन कार्यक्रम बघायला मी गेले होते. खरं म्हणजे उत्तम वातानुकूलीत हॉलमध्ये कार्यक्रम होता. कलाकारांचे पोशाख, रंगरंगोटी सर्व काही चकाचक होतं. पण रंगमंचावर एका पाठोपाठ एक चित्रपट संगीतावर आधारित नाच चालू होते. त्यात मुलं मुली दोघांचाही समावेश होता. कवायत केल्यासारखे आणि कधी कधी कमरेला झटके देऊन केलेलं ते नृत्य आणि कानठळ्या बसवणारं संगीत! यात नावीन्य काहीच नव्हतं. चित्रपटातील नृत्य–गाणी यांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात जाणवत होता. माझी फार निराशा झाली. पण प्रेक्षागृहातील विद्यार्थी मात्र टाळ्या–शिट्ट्या यांनी वातावरण दणाणून सोडत होते. त्याचवेळी मनात विचार येत होते, की तेचतेच बघण्यापेक्षा यात वेगळेपणा कसा आणता येईल?

स्नेहसंमेलन म्हणजे काय?

स्नेहसंमेलन म्हणजे सर्वांनी एकत्र येणं. स्नेहपूर्ण वातावरणात प्रत्येकाच्या सहभागाने २, ३ दिवस क्रीडा–कला, अभिव्य ती स्पर्धा अशा भरगच्च कार्यक्रमांचं आयोजन करणं. असं काहीसं हवं ना? हो नं...? गटानं करावयाचा तो उत्सव असला पाहिजे. एकमेकांच्या सहकार्याने, स्नेहाने एकत्रित कृती करून त्या कृतितून मुलांना आनंद मिळाला पाहिजे. आनंद वाटता आला पाहिजे. त्याऐवजी कधी कधी तुम्ही मुलं तक्रारीचा सूर लावता, 'शाळेतले शिक्षक नेहमी त्याच त्याच विद्यार्थ्यांना स्टेजवर येण्याची संधी देतात. आम्हाला कधीच संधी मिळत नाही.' मग यावर्षी तुम्ही स्वत:हून ही संधी घेणार नं !

स्नेहसंमेलनात कशाप्रकारे सहभागी व्हाल ?

प्रथम तुमच्या अध्यापकांजवळ सबंध वर्गाचा एखादा कार्यक्रम बसवण्याची कल्पना मांडा व त्यासाठी सर्वांनी मिळून कार्यक्रमाचे नियोजन करा. प्रयत्न करून तर बघा. सुरुवातीला एखादा कार्यक्रम सादर करायचा असेल तर कोणती खाती असतील, त्या–त्या ठिकाणी विद्यार्थी संख्या किती लागेल याचा विचार करा. प्रत्यक्ष रंगमंचावर काम करणारे विद्यार्थी कोण, रंगमंचाच्या मागील व्यवस्था सांभाळणारे कोण असतील याची यादी तयार करा. प्रकाशयोजना, पार्श्वसंगीत ही सुद्धा महत्त्वाची खाती असतात बरं का. ती देखील हाताळायला शिका. तुम्ही जो कार्यक्रम सादर करणार आहात त्या कार्यक्रमाचं स्वरूप ठरवा. उदा. एखादं हावभावासह समूहगीत बसवलंत तर सर्वांना त्यात सहभागी होता येईल. छोटंसं नाटक असं निवडा की ज्यात जास्तीत जास्त पात्र असतील. तुमच्यापैकी काहीजण नाटकातील झाडं, घरं, भिंती, वाहानं असं प्रतिकात्मक 'प्रॉपर्टी' म्हणूनसुद्धा काम करू शकतील. तुमच्यापैकी चारजणांनी एकत्र बसून नाटुकलं लिहिण्याचा प्रयत्न केला तर फारच उत्तम. तुम्हाला राजाचे सैनिक, दरबारी, शाळेतली मुलं, शूर मावळे, पक्षी अथवा प्राण्यांचं संमेलन असे प्रवेश नाटकात घालून अनेकांना त्यामध्ये सहभागी करून घेता येईल. न जाणो तुमच्यापैकी कोणी मोठेपणी नाटककार होतील. हस्तव्यवसायात वाकबगार मुलं टोप्या, मुकुट, माळा, कमरपट्टे अशा कार्यक्रमाला उपयु त वस्तू बनवू शकतील. आवश्यक तिथे तुम्हाला शिक्षकांची मदत घ्यावी लागेल; पण तुमचा उत्स्फूर्त सहभाग बघून त्यांना आनंदच वाटेल.

तुमच्यापैकी अनेकजण तबला, पेटी वाजवायला शिकत असतात. एखादा छान गात असेल तर एखादा गातागाता नाचतही असेल. व्हायोलिन, माऊथ ऑर्गन, बुलबुलतरंग जे जे वाजवणारी मुलं असतील त्यातून तुमचा छोटा वाद्यवृंदच तयार होईल. एखादा धिटुकला मस्तपैकी सूत्रसंचालन करून वाहवा मिळवेल. तुमच्यापैकी काहीजण पार्श्वसंगीताने नाटकात रंग भरतील.

शिवाजी महाराज, रमाबाई रानडे, सावित्रीबाई फुले, स्वामी विवेकानंद, ज्योतिबा फुले, राणी लक्ष्मीबाई इ. व्य तींच्या जीवनातील नाट्य, प्रसंग तुम्हाला सादर करता येतील. कार्यक्रम कोणत्याही भाषेत असला तरी तो विचार सर्वांपर्यंत पोचणं महत्त्वाचं असतं. लोकनृत्य आणि लोकसंगीत हे तर सर्वांच्या आवडीचे कार्यक्रम असतात. त्यामध्ये अनेक विद्यार्थी सहभागी होऊ शकतील महाराष्ट्राची लोकधारा, यांसारखे कार्यक्रम सर्वसमावेशक असतात.

आपली सांस्कृतिक परंपरा म्हणजे आपला अमूल्य ठेवा आहे. त्याचं जतन विविध कार्यक्रमातून करता येईल. तुम्ही बालगंधर्व चित्रपट बघितला असेल. तद्वत शारदा, सौभद्र वगैरे जुन्या संगीत नाटकातील प्रवेश सादर केलात तर सर्वांनाच संगीत नाटक म्हणजे काय ते समजेल.

दोन कार्यक्रमांच्या मधल्या जागा भरून काढण्यासाठी तुमच्यातले नकलाकार, नाट्यछटा करणारे, गायक, विनोदवीर हेरून ठेवा. त्यामुळे संपूर्ण कार्यक्रम गंभीर न होता मधेमधे विनोदाच्या फुलबाज्या उडतील.

संपूर्ण स्नेहसंमेलनात स्वयंसेवकांचं काम खूप महत्त्वाचं असतं. पाहुण्यांचं स्वागत करणं, बैठकव्यवस्था बघणं, मंडप अथवा सभागृहात शांतता राखण्यासाठी प्रयत्न करणं, रंगमंचावरील व्यवस्था बघणं, प्रदर्शन मांडणं, बक्षीस समारंभाचेवेळी अध्यक्षांच्या हातात क्रमश: बक्षीस देणं, अल्पोपाहाराची व्यवस्था वगैरे एक ना अनेक कामं त्यांना करायची असतात. शिक्षकांबरोबर दुवा साधणारे स्वयंसेवक छातीवर बिल्ला लावून ताठ मानेनं फिरतात, तेव्हा त्यांना बघून इतर विद्यार्थ्यांना आपणही असंच काम करून शाबासकी मिळवावी असं वाटतं. प्रवेशद्वाराशी रांगोळी काढणं, फलकावर उत्तम चित्र काढून स्वागतपर मजकूर लिहिणं, तोरणं लावणं, पाहुण्यांना मानवंदना देणं अशी एक ना अनेक कामं.

स्नेहसंमेलनाने तुम्ही काय मिळवाल?

एकत्र गटात काम करण्याची, अनेक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी तासन्‌तास उभं राहण्याची, आपले नेतृत्व सिद्ध करण्याची संमेलन ही संधी असते. सर्वांनी महिनाभर झटून स्नेहसंमेलन उत्तमपैकी पार पाडलंत म्हणजे तुमचं तुम्हाला समजेल, की तुम्ही कितीतरी नवीन मित्रमैत्रिणी जोडले आहेत. काही जणांच्या कलागुणांना प्रथमच वाव मिळाला आहे. शिक्षकांशी व इतरांशी बोलताना तुमच्यात एक वेगळाच आत्मविश्वास निर्माण झाला आहे. शिक्षकांची जवळीक निर्माण झाल्याने तुमची भीड चेपली आहे. प्रत्येक कार्यक्रमाची आखणी व नियोजन करण्याची सवय तुमच्यात बाणली आहे. मुख्य म्हणजे सर्वांनी स्नेहपूर्ण वातावरणात, एकत्र येऊन काम करण्याचा आनंद काय असतो, ते तुम्हाला समजेल.

श्रमपरिहारानिमित्त अल्पोपाहार करताना, गप्पागोष्टी करताना या संमेलनात काय काय राहून गेलं? कुठे कुठे फजितीची वेळ आली होती त्यातून कसं निभावून नेलं? याची हसतखेळत चर्चा होईल. पुढच्या वर्षांसाठी अधिकाधिक नव्या कल्पना प्रत्यक्षात आणण्याचा उत्साह तुम्हाला अशा स्नेहसंमेलानाने मिळेल. पुढील स्नेहसंमेलनाचे स्वरूपच तुम्ही बदलून टाकाल.

– नीलिमा करमरकर
ब–शशिकिरण, अशोक पथ,
विधी महाविद्यालय रस्ता, पुणे 411004

तुम्ही तुमच्या शाळेत स्नेहसंमेलनात सादर करण्यासाठी एकांकिका, नाट्यछटा, समूहगीताच्या शोधात आहात? मग छात्र प्रबोधनला दूरभाष करा आणि मिळवा सादरीकरणासाठी तुमचा मनपसंत खजिना!

सुयशची भरारी



सुयश जाधव

ध्येयपथावर कितीही अडचणी, संकटे आली तरीही न डगमगता जिद्‍द, विजिगिषु वृत्ती अंगी बाणवली तर काय किमया घडू शकते, हे जाणून घेऊया सोबतच्या लेखातून...

माझं नाव सुयश जाधव. सोलापूर जिल्ह्यातील पांगरी या छोट्या गावी माझा जन्म झाला. वडील वेळापूर येथे माध्यमिक शिक्षक होते. तेथेच माझे इ. १० वी पर्यंतचे शिक्षण झाले.

वडील उत्तम जलतरणपटू होते. राष्ट्रीय स्तरापर्यंतच्या स्पर्धांमध्ये त्यांचा सहभाग होता. साहजिकच 'आपल्या मुलानेही जलतरणपटू व्हावे' ही त्यांची इच्छा होती. वयाच्या चौथ्या वर्षापासूनच त्यांनी मला पोहोण्याचे धडे देण्यास सुरुवात केली. मी विहिरीत पोहायला शिकलो. थोड्याच कालावधीत मी छान पोहू लागलो. सगळ्यांना माझं कौतुक वाटू लागलं.

सर्व काही सुरळीत चालू होते. पण अचानक दैवाचा घाला पडला. मी इयत्ता सहावीत असताना दिवाळीच्या सुट्टीत माझ्या भावाच्या लग्नासाठी आम्ही सर्वजण पांगरी या आमच्या गावी गेलो होतो. एका शाळेत तो लग्न समारंभ होता. आम्ही सर्व भावंडे खेळत होतो. शाळेत लोखंडी सामान पडले होते. खेळता-खेळता मी त्यातील लोखंडी गज घेऊन फिरवू लागलो. गज उंच केला आणि तिथेच माझे दुर्दैव आडवे आले. तो गज विजेच्या तारेला लागला आणि मला जबरदस्त विजेचा ध का बसला. मी धाडकन खाली कोसळलो. मोठा आवाज झाला. बरोबरीची भावंडं सगळी घाबरून आरडा-ओरडा करू लागली. त्यांचा आवाज ऐकून घरातील मोठी माणसं धावून आली. वडिलांना परिस्थितीचे गांभीर्य कळले. त्यांनी ताबडतोब मला जवळच्या हॉस्पिटलमध्ये करमाळा येथे नेले. मी जवळजवळ २ महिने उपचारासाठी तिथे भरती होतो; पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. घरचे खूपच हताश झाले होते. डॉ टरांच्या सल्ल्याने नंतर मला मुंबईच्या हॉस्पिटलमध्ये हलवले. तिथेही चार महिने उपचार चालू होते; पण व्यर्थ. अखेर दोन्ही हात कापून टाकण्याचा निर्णय डॉ टरांनी घेतला. घरचे लोक हवालदिल झाले. मी हा आघात कसा सहन करणार या विचारांनी आई प्रचंड घाबरली होती. मला स्वत:ची चीड येत होती. त्या एका चुकीची केवढी मोठी शिक्षा मला मिळाली होती. मी निराशेच्या गर्तेत गेलो होतो. त्या काळात वडिलांनी मला भरभ कम आधार दिला. घरातील वातावरण गंभीर बनले. सतत काळजी आणि काळजी. माझा स्वभाव खूप चिडचिडा झाला होता. माझ्यामुळे आई-वडिलांना खूप त्रास सहन करावा लागला.

वडिलांसारखे राष्ट्रीय जलतरणपटू होण्याचे आपले स्वप्न तसेच राहणार, अशा विचारांनी मी निराश होत असे. वडिलांनी मला धीर दिला.

शॉक बसल्यानंतर २ वर्षे मी पूर्णपणे परावलंबी होतो. पण हळूहळू मी सावरलो. जिद्दीने काही गोष्टी मी अंगी बाणवल्या. स्वत:ची कामे स्वत:च करायचा प्रयत्न करू लागलो. माझा विश्वास वाढला. मी असाहाय नाही याची माझ्याबरोबरच माझ्या घरच्यांनाही खात्री पटू लागली. हळूहळू अभ्यासाबरोबरच पोहोण्याचा सरावही वडिलांबरोबर करू लागलो.

एकदा घरातील सर्वजण नाशिक, त्र्यंबकेश्वरला सहलीला गेलो होतो. त्र्यंबकेश्वराच्या कुंडात सर्वजण स्नानासाठी उतरले. वडिलांना वाटले हाच तो क्षण आपण सुयशला कुंडात पोहायला

न की केले. आणि आश्चर्य म्हणजे या स्पर्धेत मला दोन सुवर्ण पदकं मिळाली. अतिशय आनंद झाला. आपण पोहू शकतो. बक्षीस मिळवू शकतो. असा आत्मविश्वास निर्माण झाला. या स्पर्धेनंतर माझी राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. या स्पर्धा पुण्याला होत्या. या स्पर्धेत मला तीन सुवर्ण पदकं मिळाली. माझ्यातला उत्साह दुणावला. या नंतर मी मागे वळून पाहिलेच नाही.

सांगू या! घरच्यांचा विरोध पत्करून वडिलांनी मला पोहायला सांगितले. मी छान पोहोलो. त्यामुळे वडिलांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या.

माझी जलतरणपटू होण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी आई-वडिलांनी मला खूपच प्रोत्साहन दिले.

इ. सातवीच्या मध्यापर्यंत मी फ त शाळेत जाऊन बसायचो. लिहायला येत नव्हते. पण नंतर पट्ट्याच्या साहाय्याने लेखन करायला शिकलो. सुरुवातीला पट्ट्याची सवय होईपर्यंत खूप त्रास झाला. हाताला कळ लागायची. हात खूप दुखायचा; पण जिद्दीने लेखनाचा सराव चालू ठेवला. मी कधीही लेखनिक (रायटर) घेतला नाही. इ. सातवी व इ. आठवी मध्ये मी वर्गात दुसऱ्या क्रमांकाने पास झालो. सर्वांना खूपच आनंद झाला. मला शिक्षकांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

इ. नववीमध्ये असताना अकलूजचे श्री. उमेश गोडसे यांचे नाव जलतरण प्रशिक्षक म्हणून समजले. तेही राष्ट्रीय जलतरणपटू आहेत. त्यांच्या मार्फत अपंगांच्या स्पर्धा कधी कोठे होतात याची माहिती मिळाली. त्यांनी मला मार्गदर्शन करण्याचेही मान्य केले. माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही. वडीलही खूप खूष झाले; कारण त्यांची इच्छा आता पूर्ण होणार होती. माझी सरावाला सुरुवात झाली.

इयत्ता नववीच्या शेवटी (२००९) नाशिकला आंतरशालेय स्पर्धा होत्या. माझी ही पहिली स्पर्धा. आपण स्पर्धेत उतरतोय; पण या स्पर्धा नीट पार पडतील ना ? या विचारांनी मनात काहूर माजले. पण वडिलांनी, ''तुझी ही पहिलीच स्पर्धा आहे. बक्षीस नाही मिळाले तरी चालेल; पण स्पर्धेचा अनुभव तर न की मिळेल,'' असे समजावून सांगितल्यावर मी स्पर्धेत उतरण्याचे

या स्पर्धेनंतर मला काही कारणाने प्रशिक्षण मिळू शकले नाही. पण स्वत:च्या हिमतीवर रोज सकाळ-संध्याकाळ वेळापूरहून अकलूजला जाऊन पोहोण्याचा मी सराव करू लागलो. दिवसभर शाळा व नंतर पोहोण्याचा सराव असा धकाधकीचा माझा दिवस सुरू झाला. याच काळात दहावीचे लास व अभ्यास जोमाने सुरू होते. विश्रांती अशी नव्हतीच. सगळी तारेवरची कसरत चालू होती. पण मी सरावात कसूर केली नाही. पोहोण्यामुळे अभ्यासाचा लास काहीवेळा बुडायचा; पण घरचा पूर्ण पाठिंबा असल्याने ते कधीही रागावले नाही. त्यातच दहावीची परीक्षा झाली. निकाल लागला. ८७% मार्क मिळवून मी वेळापूर केंद्रातून सर्वप्रथम आलो. समाजशास्त्र विषयात ९६ तर विज्ञानात ९७ असे गुण मिळवून त्या विषयात प्रथम आलो.

विज्ञान शाखेत अकरावीला प्रवेश घेतला. पण त्याचे

आयुष्यात काय केवळ काटेरी डंख आहेत। डोळे उघडून पाहा तरी, प्रत्येकाला फुलपाखराचे पंख आहेत ।।

PSLV-C-15 - प्रक्षेपण : १२ जुलै २०१० कॉर्टोसॅट - २ व ४ इतर उपग्रह असे एकूण ५

प्रायोजक - संतुल, (श्री. मिलिंद संत), पुणे.

जलतरणस्पर्धा पदकांचा त ता			
स्पर्धा	सुवर्ण	रजत	कांस्य
राज्यस्तरीय	३७	-	१
राष्ट्रीय स्तर	१६	-	१
आंतरराष्ट्रीय	-	-	१

प्रॅ टीकल्स, लास यांचा ताण जाणवू लागला होता. त्याच दरम्यान बंगळुरू येथे आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा होती. स्पर्धेच्या आधी १५-२० दिवस मला मलेरिया झाला. ४-५ दिवस हॉस्पिटलमध्ये होतो. घरी आल्यावर थोडी विश्रांती घेऊन परत सरावाला सुरुवात केली. एवढे सर्व होऊन मी बंगळुरू पोहोचलो तर तिथेही आजाराने माझी पाठ सोडली नाही. स्पर्धेच्या दोन दिवस आधी मला *फूड पॉयझनिंग* झाले. ताप १०५ डिग्रीपर्यंत वाढला. परत १ दिवस हॉस्पिटल मध्ये गेला. आता स्पर्धेत उतरणं श य होणार नाही असे सर्वांना वाटले. पण मी जिद्दीने स्पर्धेत उतरलो आणि कांस्य पदकाचा मानकरी ठरलो.

या स्पर्धेत ४७ देशातील खेळाडू उतरले होते. या सर्वांवर मात करून मला हे यश मिळाले होते.

सराव व अभ्यास अशी कसरत चालूच होती. त्यामुळे मी बारावी ला विज्ञान सोडून १२ वी कला शाखेत प्रवेश घेतला. याच काळात मुंबईचे प्रशिक्षक श्री. राजू पालकर यांच्याकडे २ महिने सराव केला. याचा फायदा मला पुढील स्पर्धांसाठी खूप झाला. मुंबईमध्ये राहून पूर्ण वेळचा सराव केल्यामुळे माझे अभ्यासाकडे दुर्लक्ष झाले. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला सराव परीक्षेत मी सर्व विषयात च क नापास झालो. हा माझ्यासाठी खूप मोठा ध का होता. त्यामुळे जिद्दीने अभ्यासाला प्रारंभ केला. दिवसभरात फ त ४ तास झोपत असे. अशा रितीने महिनाभर अभ्यास केला. बोर्डाच्या पेपर्समध्ये विश्रांती (गॅप) असल्याने त्याचाही फायदा झाला. परीक्षा झाली. चांगल्या निकालाची अपेक्षा होती. पण वर्गातील हुशार मित्रांना मागे टाकून मी कॉलेजमध्ये ७९% मार्क मिळवून पहिला आलो. माझ्या घरची मंडळी आणि शिक्षक यांचा या गोष्टीवर विश्वासच बसत नव्हता; कारण त्यांच्या समोर सराव परीक्षेचा निर्णय होता.

बारावीच्या परीक्षेनंतर मात्र मी ठरवून पुण्याला आलो. फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश घेतला. याची मुख्य दोन कारणे होती. पोहोण्याचा सराव आणि दुसरे म्हणजे स्पर्धा परीक्षेची तयारी. सध्या मी तृतीय वर्ष कलाच्या वर्गात शिकत आहे. मी सध्या श्रीमती कल्पनाताई आगाशे यांच्या मार्गदर्शनाखाली टिळक तलावावर सराव करीत आहे. मला पोहोण्यामध्येच करिअर करायचे आहे. महाविद्यालयाकडून मला पूर्णपणे आर्थिक साहाय्य मिळत आहे तर टिळक तलावावरही मला विशेष सवलत दिली जाते. आता मात्र मला इ.स. २०१४ च्या कॉमनवेल्थ गेम्सचे व इ.स. २०१६ च्या ऑलिंपिक गेम्स वेध लागले आहेत. या स्पर्धांमध्ये मी प्रयत्नांची पराकाष्ठा करणार आहे.

अभ्यास करताना एकाग्रता, आत्मविश्वास व सातत्य ह्या त्रिसूत्रीचा वापर केल्यास यश न कीच मिळते हा माझा स्वानुभव आहे. त्याला कठीण परीश्रमाची जोड हवीच.

घरातील सर्व मंडळी, शिक्षक यांच्या पाठिंब्यामुळे, सहकार्यामुळे माझे जलतरणपटू बनण्याचं स्वप्न पूर्णत्वाच्या वाटेवर आहे. त्यामुळे मी खूप समाधानी आहे.

•••

- सुयश जाधव
फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे - ५
(शब्दांकन - सुलभा कुलकर्णी)

ओळखा पाहू मी कोण?

मी जलचर तसा भूचरही.
माझे छोटे पुढील पाय,
असती त्यास बोटे चार.
माझे मोठे मागील पाय,
असती त्यास बोटे पाच !
कातडी माझी मऊशार
राही गिळगिळीत चोवीस तास
जिव्हा माझी जणू,
बंदुकीची गोळी
पडते बाहेर, लई जोशात.
अन् लपकते किडा क्षणार्धात् !
तर, सांगता आतां
असा, आहे मी कोण?

- डॉ. पुरुषोत्तम जोशी

आत्ममग्न वा प्रसन्न वृक्ष जीव लाविती । कृष्ण झावळ्यांमधून चंद्र येई सोबती ।।

PSLV-C-16 – प्रक्षेपण : **२० एप्रिल २०११** ए स सॅट (अवकाशाच्या छायाचित्रासाठी भारत-सिंगापूरचा संयु त उपग्रह)

पदवीपूर्व/पदव्युत्तर करिअर समुपदेशन – प्रज्ञा मानस संशोधिका , ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१४४

साकव

– शशिकांत पाटील

सकाळपासून पावसाची रिपरिप सारखी चालू होती. गेल्या सालच्या मानानं या वर्षी पाऊस तसा वेळेवर आणि जोरदार पडत होता. अधूनमधून जोराच्या सरी कोसळत होत्या; त्यामुळे साखरवाडीच्या माणसांना घराच्या, खोपटाच्या बाहेर पडता येत नव्हतं. मृगाच्या पाठोपाठ आर्द्रा पडल्यामुळं पेरण्या होऊन पिकं तासी (जमिनीतून वर येणे) लागली व्हती. गायी, वासरं, बैल समदी हंबरत कोट्यांत बसून होती. टाकलेल्या वैरणीचासुद्धा कंटाळा करीत होती. शेरडं, मेंढरे तेवढी बाहेर पडून झाडांच्या झोडपणीपासून निवारा बघून आडोशाला बसली व्हती. सगळं कसं सादळल्यासारखं वाटत होतं. गडी मान्सं धोतरं पांघरून बसली होती. बाया-बापड्यांची गरम पिटलं आन् भाकरी थापायाची लगबग चालली होती.

''धाकल्या पुकापाठी ह्यो थोरला पुक (पुष्य नक्षत्र) जर असाच बरसत ऱ्हायला तर आ सी वल्ला दुष्काळ ठरल्यालाच हाय बय...'' चांगुअण्णा.

''ह्ये बगा, ह्ये बोल मनल्या बोलायचे ऱ्हायतं. आन् बोल्लं तर असं वंगाळ कायीतरी...'' पारबतीलाबी तोंड सुटलं.

''अगं तेल, तिकट , मीट काई आणायला येईना. आन् तशात जांबळदऱ्यातून आलेली ही पोरं, घोंगतं पांघरून शाळंला जातेत आन् म्हागारी येतेत. गुरुजीबी आसंच वार लावून ज्येवतेत कुणाच्या ना कुणाच्या घराला,'' चांगूआण्णांनं आपल्यापुढचं कोडं मांडलं.

आण्णा असं मनातलं बोललं तवा पारबती गप्प बसली. आपलं कसंही होईल पण जांबळदऱ्यातल्या पोरांचे काय करायचं? चारपाच पोरं, आपण स्वत: ठिवून घेतलेली. जास्त पाऊस आसंल तवा ऱ्हातेल हितंच. ओढा जास्त ओढीचा. त्येच्यावरचा सांकू मोडलेला. जायची-यायची सोय ऱ्हाई. साखरवाडी आन् जांभळदरा ह्यांच्यामधी हाच एक साकव. तेवढाच दोन गावांतील जा-ये करण्याचा मार्ग.

दोन दिवसांत पाऊस उघडला. चांगूआण्णा प्रथमच कोट्याच्या बाहेर पडले. जित्राबे (गाई-गुरं) चरायला सोडली. न्याहारी उरकून त्यांनी शाळेचा रस्ता धरला. पोरं जमली होती.

''आवं गुरुजी...'' त्यांनी हाक मारली.

गुरुजी मुलांना शांत बसवून बाहेर आले. बाहेरच्या बाकावर बसायची खूण करीत बोलले, ''या चांगूआण्णा, बसा. हं बोला, काय काम काढलंत आमच्याकडं...''

''तुमच्याकडं... तसं मणलं तर तुमच्याकडं हाय बी आन् ऱ्हायीबी.''

''असं कोड्यात टाकल्यासारखं नका बुवा बोलू. जे काय हाय त्ये स्पष्ट बोला.'' गुरुजी.

''त्येच मंजी असं हाय जांबळदऱ्याला जाया-येया एकच



ओढा हाय. त्येच्या वरचा साकव मोडून पडलेला हाय. ओढा जराशीक खोल हाय. आन् दोन-तीन ढेंगा लांब हाय. त्येला पावसाळ्यात पाणी आलं मंजी बलामतच की. रोज पाच-सा पोरं जांबळदऱ्यातून हिथं शाळंला येत्याती. आन् सांच्यापारी माघारी जातात. त्येंच्या शाळंची खोटी तरी किती दिस करायची. जादा पाऊसपाणी पडंल त्या दिशी, माझ्याकडं सोय हायचं की; पण येरीवारी...'' चांगूआण्णा.

''मग इचार काय हाय तुमचा. तुमच्या म्हणण्यानुसार आम्ही सगळे वागू. नवा साकव तयार करू. मी स्वत: मुलांना...'' गुरुजी

''त्येच्यासाठी दांड्या लागतील. निलगिरीची झाडं लागतील. पुरत्या लांबीच्या दांड्या काढून खालून जोड देयाची. खालचा भाग तयार झाला की, मंग वरच्या दोन दांड्या थोड्या अंतरावर ठोकून बसवायच्या. सा दांडे बसविलं, की काम व्हतंय. मला ह्या कामासाठी तुमची मदत पाहिजेल. गावातल्या चार-पाचजणांनी 'होय' भरलं मंजी नव्यानं साकव तयार झालाच म्हणून समजा.''

किशाबापू , म्हादा उकीरडे, गंपा जाधव, सदातात्या लागंल ती मदत करायला तयार झाले. नामा सुतार आपली इकनं (हत्यारं) घेऊन आला. चांगूआण्णा आन् गुरुजी म्होरकेपणा करायला तयार होतेच.

शुक्रवारी जागा बगितली. निब्बर खडक बगूनशान त्यावर साकव बांदायचा ठराव सदस्यांनी मंजूर केला. निलगिरीची झाडं तोडून आणली. ती आणण्यासाठी थोडी मोठी पोरं बोलावली. खडकावर तीन-तीन वाव अंतरावर खुणा करून दांड्या कापून घेतल्या. त्या उलट्या ठेवून त्यावर हाता-हाताच्या अंतरावर दांड ठोकले. कुऱ्हाडी खिळे ठोकून जोडणी तयार केली. आन् सर्वांनी 'भवानीआईचा उदो उदो' करत हा साकव खडकावर टेकविला. त्येच्यावर उभं सहा दांड कुऱ्हाडी खिळं ठोकून जाम बसविलं. आन् तीन दांडावर एका बाजूस आणि तीन दांडावर दुसऱ्या बाजूस दोन दांड्यावर बसविल्या. साकव तयार झाला व्हता. खडकावरून तो हलू नये म्हणून त्याच्या भ कमपणासाठी दगड अन् माती लागली. मोठमोठी ढेकळं काढून पावटीच्या मातीनं ती जागा भरून घेतली. वरच्या अंगानं थोडं तारांचं काम केलं. साकव खालच्या वरच्या अंगानं मजबूत झाला. पाच सहाजणांनी त्याच्यावरून दोन-चार वेळा येरझारा केल्या. मुलांनी एकच गलका केला.

म्हणता म्हणता ही बातमी गावभर पसरायला वेळ लागला नाही. दुसऱ्या दिवशी शनिवार होता. शाळेत गुरुजींनी सभा बोलावली. चांगूआण्णा, किशाबापू, महादेव उकीरडे, गंपा जाधव, सदातात्या या साऱ्यांचा सत्कार केला. नवा साकव तयार केल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. गुरुजींनी सर्वांसमोर मुलांना 'साकव'पर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी घेतली. त्या दिवसापासून शाळा दिमाखदारपणे चालू लागली. एक एक जबाबदारी सर्वांनीच उचलली.

चांगूआण्णांनी जास्त पाऊस असेल त्या दिवशी मुलांच्या रात्रीच्या जेवणाची जबाबदारी घेतली. परगावच्या विद्यार्थ्यांसाठी मोठी सतरंजी देण्याचे सदातात्यांनी कबूल केले. प्रत्येकाला एकेक चादर देण्याची म्हादा, गंपा यांनी जबाबदारी घेतली. परात आणि वाटी देण्याचे त्यांच्या घरच्या बायामान्सांनी निश्चित केले.

शाळेला एक नवे रूप आले. नवा साकव, नवी शाळा.

•••

- श. मा. पाटील
साईनगर, सिद्धीविनायक मंदिराजवळ,
एम. आय. डी. सी रस्ता,
उस्मानाबाद 413501

हसवा-हसवी

रुग्ण : डॉ टरसाहेब, किती दिवस झाले, पण माझा आजार काही बरा होत नाही. चांगले औषध द्या.

डॉ टर : त्यासाठी तुम्हांला तुमचे विचार बदलावे लागतील. मनामध्ये असा विचार करायचा की, आपण आता बरे होत आहोत! आजार आपोआप बरा होईल.

डॉ टरांचे हे उत्तर ऐकून रुग्ण उठून घरी जाऊ लागला.

डॉ टर : अरे ! माझी फी तर देऊन जा !!!

रुग्ण : तुम्ही पण असाच मनात विचार करा की, तुम्हांला तुमची फी मिळाली !

संवाद कौशल्य

तुमचे संवाद कौशल्य विकसित करण्यासाठी तुम्हीच डोळसपणे प्रयत्न करावेत, यासाठी छात्र प्रबोधन दिवाळी अंकात (सौर कार्तिक/नोव्हेंबर २०१३) 'संवाद कौशल्य' हा विशेष विभाग (२० पाने) प्रकाशित करण्यात आला. संवाद म्हणजे काय? प्रभावी संवादासाठी कोणती कौशल्ये विकसित करायला हवी? संभाषणाच्या विविध छटा इ. विषयांवरचे दीपावली विशेषांकातील लेख तुम्ही निश्चित वाचले असतील. तुमचं संवाद कौशल्य विविधांगांनी फुलवण्यासाठी यापुढेही दर महिन्याला छात्र प्रबोधनच्या अंकातून ही लेखमाला प्रकाशित होईल.

औपचारिक संवादाची पूर्वतयारी

–स्मिता निरगुडकर

लेखांक – ६

संवाद म्हणजे न की काय, हे आपण दिवाळी विशेषांकामधून जाणून घेतले आहेच. शब्दातून, मौनातून आपल्या देहबोलीतून, आपल्या मनातील भावना तसेच विचारांची, माहितीची देवाणघेवाणही आपण संवादाच्या माध्यमातूनच करत असतो.

एका व्य तीला दुसऱ्या व्य तीशी जे विचार बोलायचे असतात, ते जसेच्या तसे, कुठल्याही अडथळ्याशिवाय त्या व्य तीपर्यंत पोहोचणे आवश्यक असते. यालाच संवाद म्हणतात. थोड यात संवादामध्ये नेहमीच एकावेळी एक व्य ती बोलणारी असते तर दुसरी ऐकणारी असते. संवादामध्ये बोलणाऱ्या व्य तीइतकेच ऐकणाऱ्या व्य हत्त्व असते.

संवादाचे मुख्यत: दोन प्रकार असतात.

१. अनौपचारिक संवाद

२. औपचारिक संवाद

१. अनौपचारिक संवाद – सर्वसाधारणपणे कुटुंबात, मित्र-मैत्रिणींमध्ये घडतात. अशा प्रकारच्या संवादात कोणतेही उपचार, पद्धती, शिष्टाचार, नियम सांभाळण्याची फारशी गरज नसते.

२. औपचारिक संवाद – या संवादात काही नियम, उपचार पाळावे लागतात. औपचारिक संवादाची काही तंत्रेही असतात. ते आपण पुढे पाहू. औपचारिक संवाद हा बहुतेक वेळा पूर्वनियोजित असतो. त्यात विशिष्ट हेतू असतो. कोणती माहिती कशी द्यायची किंवा मिळवायची याची निश्चित रूपरेषा ठरलेली असते. औपचारिक संवादाची मुख्यत: तीन माध्यमे आहेत.

अ) भाषिक-मौखिक – उदा. व्याख्यान, व तृत्व, नाटक, सिनेमा, गायन, मुलाखती, बैठका इ.

आ) भाषिक-लिखित – लेख, पत्र, निबंध, इ-मेल इ.

इ) अभाषिक – वादन, नृत्य, शिल्पकला, चित्रकला

यापैकी कोणत्या माध्यमाद्वारे आपण संवाद साधणार आहोत त्यानुसार त्याची तयारी करावी लागते. या तिन्ही प्रकारच्या संवादांची कौशल्ये विकसित करण्यासाठी जे समान मुद्दे आहेत, त्यांचा इथे उल्लेख केलेला आहे.

महत्त्वाचा मुद्दा म्हणजे – संवाद साधण्याचे कारण काय आहे? या कारणांची छोटीशी यादी खाली देत आहे. यामध्ये प्रसंगानुरूप अजूनही भर घालता येईल

१. इतरांबरोबर संपर्कात राहण्यासाठी

२. कोणाला सल्ला देण्यासाठी

३. शिकविण्यासाठी

४. नियमावली समजावून देण्यासाठी

५. मूल्यांची देवाण-घेवाण करण्यासाठी

६. आपली सर्जनशीलता दाखविण्यासाठी

७. आपले विचार-तत्त्वज्ञान इतरांपर्यंत पोहोचविण्यासाठी

८. प्रयोगाचे निष्कर्ष मांडण्यासाठी

९. मालाच्या खरेदी-विक्रीसाठी

१०. वस्तूची जाहिरात करण्यासाठी

संवाद साधण्याच्या कारणांचा विचार केल्यावर असे लक्षात येते, की सर्वप्रथम आपल्याला ज्या विषयावर संवाद साधायचा आहे तो विषय लक्षात आला पाहिजे. त्या विषयाचे जेवढे ज्ञान, माहिती मिळवता येईल ती मिळवली पाहिजे. ज्याच्याबरोबर त्या विशिष्ट विषयावर संवाद होणार आहे त्याचीदेखील सखोल माहिती संवाद साधणाऱ्याला असली पाहिजे. त्यात समोरच्या व्य तीच्या आवडी-निवडी, तिची स्वभाववैशिष्ट्ये, लकबी इ. अनेक गोष्टींची माहिती संवादकर्त्याने करून घेणे फायद्याचे असते. तसेच या संवादामुळे मला व इतरांना त्याचा काय उपयोग करून घ्यायचा आहे; काय माहिती मिळवणे योग्य होणार आहे. हे आधी ठरवलेले असावे लागते.

औपचारिक संवाद साधण्यापूर्वी त्याची काही विशिष्ट तंत्रे असतात आणि ती लक्षात घेणे खूप आवश्यक असते. वेगवेगळ्या माध्यमाची तंत्रे कोणती ती पाहू या.

अ) भाषिक-मौखिक संवाद -

१. बोलण्याचा वेग - बोलण्याचा वेग खूप भरभर नसावा; तसेच खूप संथपणे बोलू नये. आपले बोलणे तोंडातल्या तोंडात व अस्पष्ट नसावे. अस्पष्ट बोलण्यामुळे समोरच्याला विषय नीट लक्षात येत नाही व त्यामुळे उत्तरे योग्य मिळत नाहीत. गैरसमज होण्याची श यता असते. म्हणजेच योग्य त्या वेगात व स्पष्टपणे बोलावे.

२. विरामचिन्हांचा योग्य वापर - शब्द, वा य योग्य त्या विरामचिन्हांचा वापर करून उच्चारावीत. योग्य ठिकाणी शब्दावर जोर देणे, थांबणे आवश्यक ठरते. यामुळे आपण काय विचार मांडतोय हे ऐकणे, समजून घेणे सोपे होते. विचारांचा अर्थ स्पष्ट होण्यास मदत होते.

३. आवाजातील चढ-उतार - आवाजात योग्य तो चढ-उतार असावा. एकसुरी, कंटाळवाणे बोलणे होत नाही ना याकडे लक्ष द्यावे. आवाज व उच्चार यात दोन्हीत योग्य चढ-उतार असावेत.

४. आवाजाचा पोत- आवाजाचा पोत सुस्पष्ट असावा. मुद्दाम घोगऱ्या-किनऱ्या आवाजात बोलणे टाळावे. यासाठी काही सराव करता येतात. थोड यात गरज नसताना मुद्दाम वेगळ्या आवाजात बोलू नये.

५. भाषा - खूप अवघड, न समजेल अशा भाषेत बोलू नये. साधी-सोपी-सरळ भाषा वापरावी. बोजड वा प्रचार, शब्द वापरण्याची गरज नसते.

६. देहबोली - विचार, चर्चेचे सूत्र यांना योग्य ठरेल अशी देहबोली असावी. चेहऱ्यावरील हावभाव, हातवारे योग्य असावेत. भाषा व देहबोली यात फरक पडणार नाही, याची काळजी घ्यावी.

७. पूर्वज्ञान - ज्या विषयावर, ज्या व्य तीशी आपण बोलणार आहोत त्याविषयी पुरेसे योग्य ते पूर्वज्ञान करून घेणे गरजेचे असते. म्हणून ती माहिती सखोल मिळविण्याचा प्रयत्न करावा.

८. शब्दसंग्रह - शब्दसंग्रह विपुल असणे हे औपचारिक संवादात महत्त्वाचे असते.

९. मानसिकता - भाषिक संवादातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुमच्या बोलण्यावर समोरची व्य ती तिचे जे विचार व्य त करणार आहे, म्हणणे मांडणार आहे, ते शांतपणे ऐकून घेण्याची मानसिकता तयार करावी लागते.

समोरची व्य ती बोलत असताना तिच्या नजरेला नजर भिडवण्याचा प्रयत्न करावा. त्यांच्या बोलण्या-दरम्यान तुम्ही अभाषिक प्रतिक्रिया देण्याचा प्रयत्न करू शकता. जसे मान डोलावणे, स्मितहास्य इ.

समोरच्या व्य तीचे विचार तुम्हाला न पटणारे असतील तरी त्याविषयीची तुमची नकारात्मकता तुम्ही तुमच्या देहबोलीतून, चेहऱ्यावरील भावांवरून व्य त होणार नाही, याची काळजी घ्यावी लागते. समोरच्याच्या बोलण्यातील मुख्य मुद्द्यांवर तुमचे लक्ष केंद्रीभूत असू द्यावे. योग्यवेळी फ त तुमच्या शंकांचे निरसन करून घ्यावे. एक गोष्ट निश्चितपणे लक्षात ठेवावी की आपण जेव्हा समोरासमोर संवाद करत असतो तेव्हा समोरचा ५०% लक्ष आपल्या देहबोलीवर ४०% आवाजातील

अमृताचा शिडकाव केला कसा पावसाने। वठलेल्या बुंध्यांना आली पाहा फुले, पाने ।।

PSLV-C-19 - प्रक्षेपण : २६ एप्रिल २०१२ रिसॅट - १ (भारतीय हवामानाचे दिवस आणि रात्रीचे फोटो घेण्यासाठी)

प्रायोजक - श्री. सुरेंद्र कापसे, प्रिन्स्टन, अमेरिका.

तुमची संवाद साधण्याची तयारी झाली की नाही, हे पाहण्यासाठी पुढे काही प्रश्न दिले आहेत. त्याची उत्तरे मिळवून तुम्ही एक चाचपणी घेऊ शकता.

१) तुम्हाला हवे ते शब्द हवे तेव्हा नेमकेपणाने सुचतात का?
२) तुम्ही ज्या माध्यमातून संवाद साधणार आहात, त्या माध्यमाला अनुरूप अशी प्रभावी देहबोली, चेहऱ्यावरचे हावभाव, हातवारे यांचा वापर करू शकता का?
३) कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय तुम्ही दुसऱ्याचे म्हणणे शांतपणे ऐकू शकता का ?
४) तुम्हाला स्पष्ट न झालेल्या विषयाचे स्पष्टीकरण तुम्ही समोरच्याकडून न संकोचता करून घेता का ?
५) तुम्हाला जो विषय मांडायचा आहे तो मांडताना तुम्हाला संकोचल्यासारखे, अवघडल्यासारखे वाटते का?
६) कोणत्याही माध्यमातील संवादात तुम्ही स्वत:ला समोरच्याच्या भूमिकेत ठेवून विचार करू शकता का ?

चढ-उतारावर तर १०% लक्ष विषय आशयावर देतो.

तेव्हा भाषिक संवाद जेव्हा आपण करत असतो तेव्हा वरील गोष्टींना अनन्यसाधारण महत्त्व असते. अर्थातच भाषिक माध्यमातून आपण कोणत्या पद्धतीने संवाद साधता त्यावर त्या त्या पद्धतीसाठी म्हणून थोडी वेगळी तयारी करावी लागेल. उदा. रेडिओ, फोन याद्वारे संवाद साधताना प्राधान्याने आवाज हाच महत्त्वाचा असतो.

आ) भाषिक-लिखित संवाद – या माध्यमात भाषेला खूप महत्त्व असते. इथे तुमचे शब्दज्ञान, भाषेचे वेगवेगळे अलंकार, वाक्प्रचार यांना महत्त्व असते. यासाठी तुमचे वाचन विपुल असावे लागते. या माध्यमात विपुल शब्दसंपदा महत्त्वाची असते. या प्रकारच्या संवादात १००% लक्ष हे भाषा व आशय यावरच एकवटलेले असते.

इ) अभाषिक संवाद – या माध्यमात आपण बोलीभाषा कमीत-कमी वापरत असतो, त्यामुळे मांडत असलेल्या विषयाची सर्वांगीण सखोल माहिती असणे गरजेचे असते. लौकिकार्थाची जी भाषा आहे ती आपल्याला आपल्या कृतीतून-कलेतून दाखवायची असते. त्यामुळे आपल्याकडून नेमकेपणाने काम होण्याची गरज असते. इथे समोरची व्य ती ५०% लक्ष देहबोली व ५०% लक्ष आशयावर देते. इथेही आपण कोणत्या प्रकारात संवाद करतो यावर ही ट केवारी बदलत असते. उदा. जसे नृत्य संवाद असेल तर ८० % देहबोली, १०% आशय व १० % भाषा असा फरक होत असतो.चित्रकला हा प्रकार असेल तर देहबोली फारशी महत्त्वाची नसते.

संवादाचा परीणाम तुम्हाला येणाऱ्या विविध अनुभवांवर विकसित होत असतो. तसेच तो आपल्या विचारांची आणि कृतींची दिशा देखील ठरवत असतो. हे चक्र सतत चालू असते. त्याचा आपल्या विचार, कृतीवर सतत प्रभाव पडत असतो. हेच विचार, कृती आपले पूर्वानुभव ठरतात. याचा परिणाम आपल्यावर होतो व या सगळ्या अनुभवाने आपले पुढील संवाद घडत राहातात. प्रभावी औपचारिक संवाद साधला जाण्यामध्ये ह्या चक्राला खूप महत्त्व असते.

थोड यात, औपचारिक संवाद ही अभ्यासाने विकसित करण्याची व अनुभवाने समृद्ध करण्याची कला आहे.

•••

-स्मिता निरगुडकर
प्रज्ञामानस संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी,
५१० सदाशिव पेठ, पुणे - ३०

ओळखा पाहू मी कोण?

देवांनी घेतलेल्या अवतारांपैकी मी एक आहे,
भूचर तसा जलचरही !
दंतहीन असती माझे जबडे पण,
पकड तयांची जणू सांडशी यमाची !
कातडी माझी कठीण कवची, करी स्पर्धा चिलखताशी !
मम डोकं अन् पाय् घेतो ओढून त्यांत,
लागता चाहूल शत्रुची !
वळत नाही, हलत नाही, पडून राहातो
ढिम्म् प्राणहीन प्राण्यासम !
आता सांगा बरं, आहे मी कोण?

– डॉ. पुरुषोत्तम जोशी



सफर कॅडबरी जगताची

– कविता मेहेंदळे

'कॅडबरी' असं नाव जरी उच्चारलं तरी आपल्याला तिची मऊशार, मधाळ, मधुर अशी जिभेवर रेंगाळणारी चव क्षणार्धात आठवते. कशी तयार करतात ही कॅडबरी? बर्मिंगहॅममधील कॅडबरी वर्ल्डची सफर करत जाणून घेऊया तिच्या निर्मितीची कहाणी !

चॉकलेट फॅ टरी म्हणजे 'कॅडबरी बोर्नव्हिले' येथील कारखाना पाहण्यासाठी माझ्या मुलानं तिकिटं बुक केली आणि आमचा आनंद गगनात मावेना. लंडनच्या बर्मिंगहॅममध्ये बोर्नव्हिले नावाचं छोटंसं गाव वसलंय. हेच ते 'कॅडबरी वर्ल्ड!' आम्हाला सकाळी दहा वाजून वीस मिनिटांची वेळ आत प्रवेश करण्यासाठी मिळाली होती. वेळेवर पोहोचण्यासाठी सकाळी साडेसातलाच घर सोडलं आणि रेल्वेने 'बर्मिंगहॅम न्यू-स्ट्रीट' स्टेशनवर पोहोचलो. तिथून प्लॅटफॉर्म नंबर अकरावरून पुढची रेल्वे गाडी घेतली. 'सिलीओक' स्टेशन गेलं आणि 'बोर्नव्हिले'ला गाडी थांबली. सर्वांनी पटापट फ्लॅटफॉर्मवर उड्या मारल्या. इथली बाकं, इथल्या *शेडस्* जांभळ्या रंगाच्या होत्या. कमाल म्हणजे फॅ टरीकडे जाण्याचा रस्ता दाखवणारा बाणसुद्धा च क जांभळा!

वळणदार मोकळा रस्ता, बाजूने फुलझाडांची रेलचेल आणि पुढच्या खुणा दाखवणारे बाण न्याहाळत आम्ही निघालो. गुच्छ-गुच्छांनी भरून आलेल्या गुलबक्षी फुलझाडाचे फोटो काढून आम्ही चालत राहिलो. पार्किंगच्या ठिकाणावरून दृष्टिक्षेपात आता कॅडबरी फॅ टरीची इमारत दिसली. पावलं झपाझप पडायला लागली. चकचकीत जांभळ्या इमारतीसमोर उभे राहिलो तेव्हा सकाळचे सव्वादहा वाजले होते. 'कॅडबरी वर्ल्ड' या मोठ्या इंग्रजी अक्षरांच्या *परपल गोल्ड* खुलावटीपाशी उभं राहून आम्ही फोटो काढले. संपूर्ण इमारत पारदर्शक काचेची होती.

हॉलमध्ये शिरताच दोन कोकोबीन्सच्या कार्टुनस्नी आमचं स्वागत केलं. सुरुवातीला काऊंटरवरच दोन-दोन कॅडबरीज खाऊ म्हणून मिळाल्या. तिथून आता कॅडबरीच्या सुरुवातीपासूनच्या माहितीला प्रारंभ झाला. आतमधल्या खोलीत, थोड्याशा अंधुक प्रकाशात चार देखाव्यांच्या साकारणीतून, कॅडबरीच्या उगमापाशी आम्ही पोहोचलो. प्रत्येक देखाव्यापाशी दिव्याच्या शेडखाली एका वहीच्या पानात मावेल इतकी माहिती लिहिली होती. सोळाव्या शतकाच्या सुरुवातीला इ. स. १५१९ मध्ये स्पॅनिश खलाशी, हेरमन कॉर्टेस (Herman cortes) मे सिकन किनाऱ्यावर वसंत ऋतूमध्ये उतरला. मे सिकोमधल्या तिथल्या आवडत्या चॉकलेट या पेयाची कॉर्टेसने प्रथम चव पाहिली. ते पेय म्हणजे बियांची पावडर होती, ज्यामध्ये मऊसर फेसाळलेपण होतं. पेय लालसर दिसत होतं. कडवट लागत होतं. त्यामध्ये वासाची फुलं, व्हॅनिला आणि मध घातला होता. गार पाण्यातलं हे पेय 'रुचकर' लागत होतं. आणखीही असेच चार देखावे सांगत होते की आदिमानवापासूनच्या काळापासून कोको बियांपासून तयार केलेलं पेय वापरात होतं. पुढच्या खोल्यांमध्ये 'लेझर शो' होते. ताजतवानं करणारं, पोट सुधारणारं म्हणून या पेयाला कशी मान्यता मिळत गेली याचं चित्रण त्या 'शो' मध्ये करण्यात आलं होतं. *ॲनिमेशनमुळे* आकर्षकतेत भरच पडत होती.

१८३१ मध्ये सध्याच्या ठिकाणी, लहानशा प्रमाणात कॅडबरी चॉकलेट फॅ टरी सुरू झाली. तत्पूर्वी म्हणजे १८२४ मध्ये 'जॉन कॅडबरीने' *बुलस्ट्रीटवर* चॉकलेटचं पहिलं दुकान उघडलं होतं. आत्ता जो चॉकलेट बार आपण हाताळतो तो प्रथम फ्रान्समध्ये तयार झाला. नंतर १८७९ साली हा 'बार' बोर्नव्हिलेमध्ये तयार होऊ लागला.

प्रायोजक - श्री. अजित भिडे (डायरे टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा.लि. ☎ २५३८०४०६) **पुणे.**

कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने, जॉर्ज कॅडबरी या जॉनच्या मुलाने फॅ टरीच्या आवारात सोळा घरं बांधली. स्वच्छता आणि शिस्त या लोकांच्या अंगात भिनलेली असते. त्याचं प्रत्यंतर आजच्या मितीला या विस्तारलेल्या आवारातही कळून येत होतं. आत्तापर्यंत तिथं १४३ घरं बांधली गेली. फुलझाडं, हिरवळ, बगीचे मोठ्या प्रमाणावर लावले गेले. सौंदर्यदृष्टीने फुलविलेल्या या गावाला 'गार्डन-व्हिलेज' म्हणून लोकं ओळखू लागले. भाज्या, फळांची लागवड करून इथे स्वयंपूर्णता आणली गेली.

यावर्षी कॅडबरी फॅ टरीला १७० वर्षं पूर्ण झाली. जगातल्या कानाकोपऱ्यातल्या लहान मुलांपासून सर्वांना कॅडबरीची 'न्यारी' चव आवडते आहे. जून १९०५ मध्ये आजचा कॅडबरी बार म्हणजे पहिली डेअरी मिल्क *लाँच* झाली. अशी माहिती ऐकता ऐकता आम्ही एका मोठ्या दालनात प्रवेशलो. तिथे एका प्रचंड मोठ्या गोलाकार मजबूत भांड्यामध्ये विजेच्या साहाय्याने एक *ब्लेंडर* फिरत होता. त्याचं तिथलं तापमान २३°C होतं. कोको पावडर, दूध आणि साखरेचं मिश्रण एका मोठ्या पातेल्यात घोटून निघत होतं. चकचकीत आणि गुळगळीत असा द्राव पाहताना त्याचा गोड गंध घमघमला होता. पुढे काचेच्या भिंतीवरून आतमधल्या यंत्रसामुग्रीवर नजर टाकीत आम्ही चाललो होतो. वस्त्रगाळ कोको पावडरचं रूपांतर क्रीमी बटरमध्ये कसं होतं, हे सांगणारे *डिस्प्ले* वाटेमध्ये होते.

इ. स. १९२० ला कॅडबरी *परपल* आणि गोल्ड झाली. दोन दुधाच्या ग्लासचं प्रतीक त्याआधीच होतं. जॉर्जचा भाऊ विल्यमच्या सही करण्याच्या विशिष्ट पद्धतीवरून सध्याच्या कॅडबरी (cadbury) या अक्षरांचा 'लोगो' इ. स. १९५२ मध्ये अस्तित्वात आला. जाहिरातीतून जोरदार विक्रीची सुरुवात झाली आणि त्यामध्ये अधिकाधिक उत्पादनं सुरू झाली. फ्रूट ॲन्ड नट, कर्लीबर्ली, मिल्की ट्रे, रोझेस असे नाना प्रकार चवीने खाणाऱ्यांसाठी तयार व्हायला लागले. इ. स. १९५५ मध्ये प्रथमत: कॅडबरीची जाहिरात टी.व्ही वर झळकली. अनेक वर्षांच्या प्रायोगिकतेतून, कष्टातून उभारलेली ही फॅ टरी इ. स. १९९० पासून पर्यटकांचं आकर्षण बनली.

सर्वांसाठी खुली झाली.

इथून पुढे आम्हाला पॅसेजमधून पॅकिंग विभाग दाखवण्यात आला. पॅकिंगची अद्ययावत यंत्रणा पाहून अवाक व्हायला होत होतं. यंत्रे मोज याच माणसांच्या देखरेखीखाली शिस्तीत राबत होती. ते मोजकेच लोक होते. एका लयीत कॅडबरी पॅकिंगसाठी पुढे सरकत होती. दोन फूट उंचावरून खाली उतरताना त्या पट्ट्यावर परस्पर गोल्डन वेष्टनात बांधली जात होती. आकार, वजन किंवा गुणवत्तेमध्ये जरासा फरक नोंदवला गेला तरी तो 'पीस' यंत्राद्वारे वेगळा काढला जातो. दोन मिल्कबार तिथे बाजूला पडले होते. मिनिटाला ३०० बार *रॅप* होत होते. केवढी तत्पर यंत्रणा! केवढी दक्षता! केवढा अचूकतेचा आग्रह! त्यामुळेच कॅडबरी आज उच्च मानांकनाने बाजारपेठेत आणि मनामनात जागा पटकावून बसलीय.

फार पूर्वीपासून कोकोबीन्सची आयात घाना, इंडोनेशिया, कॅरेबियन इ. बेटांमधून केली जाते. दूध, साखर काय किंवा सुकामेव्यासारखे इतर पदार्थ काय, उत्तम प्रतीच्या मालाला पर्याय नाही, याची इथे खात्री पटत होती.

तिथून बाहेर पडल्यावर एका मोठ्या हॉलच्या प्रवेशापाशी थांबलो. लि वीड चॉकलेटचे छोटे प्लॅस्टीक ग्लास तिथे आमच्या हातामध्ये दिले गले. वा! मनसो त चॉकलेट उपलब्ध होतं. एक ग्लास संपला की दुसरा. आता मात्र गोडाचा वीट आला. समोरच्या टेबलवर चॉकलेटचे मेंदीसारखे कोन होते. मुलं स्वत:ची नावं चॉकलेटनी कोरत होती.

मुलांना खेळण्यासाठी एक दालन होते. तिथे चॉकलेटचे 'साचे' उपलब्ध होते. तिकडे कॅडबरीच्या जमिनीवर

उड्या मारताच कॅडबरीचे तुकडे होत होते. पुन्हा आपोआप जोडले जात होते. तिथे मुलांचा 'फुल टू दंगा' सुरू होता. इतरही अनेक मजेमजेचे खेळ तेथे होते. टेबलवरचा पसारा आवरून स्वच्छता ठेवणारी तत्पर मंडळीही त्यांच्या गणवेशात कार्यरत होती.

यानंतर आपण कॅडबरीच्या मोठ्या *आऊटलेटमध्ये* पोहोचतो. *डार्क चॉकलेट, ड्रिंकिंग चॉकलेट.* कितीतरी तऱ्हेतऱ्हेची चॉकलेट्स आणि इतर उत्पादनं इथे खचाखच भरलेली आहेत. बाजारभावापेक्षा अर्थातच स्वस्त आहेत. खरेदीचा मोह आवरणं आपल्याला श य नसतं. 'एवढे तिथपर्यंत गेलोच आहे, तर मनपसंत खरेदी करू' असे विचार मनात येत होते. खरेदी करणं अपरिहार्य होतं आणि आनंददायी होतं. काऊंटरवर बिलासह एक छोटं कार्टुन भेट मिळालं. तराजूत पारडी समतोल झाल्यावर दुकानदारानं आणखी दोन चिमट्या काजू त्यामध्ये घालून 'झुकतं माप' देऊन खुश करावं ना, त्याची आठवण या भेटीमुळे झाली.

दमल्या-भागल्या पर्यटकांसाठी त्यांचं *कॅफे* आहे. समोरच्या मैदानावर बाकं टाकलेली आहेत. मुलांसाठी खेळाची साधनं आहेत. तिथून गावात फिरण्यासाठी टॅ सी, बसेसची माहिती पुरवणारी यंत्रणा आहे. सर्व सिद्धता आहे. येणाऱ्याला खुशी वाटून टाकण्याचं *'परपल गोल्डचं'* तंत्र आहे. आतमध्ये फोटोंना परवानगी नाही पण नेत्रांनी टिपलेली 'कॅडबरीची चवदार गोष्ट' बरोबर नेता येतेच की! मग तिथून परतताना किलोवारी खरेदी केलेली चॉकलेट्स तरी जड का वाटणार? पण मिळालेला आनंद त्याहीपेक्षा कित्येक किलोंनी अधिक आहे.

•••

- कविता मेहेंदळे
६९२/, 'सुखदा' सोसायटी,
पुणे-सातारा रस्ता, पुणे - ३७

श्रममेव जयते

या भूमीशी, या देशाशी जुळले घामाचे नाते
मिळून सारे आज गाऊ, श्रममेव जयते ।।धृ. ।।

ना आम्हा भीती उन्हाची, ना थंडी वाऱ्याची
उरात जपतो आम्ही स्वप्ने, आकाशातल्या ताऱ्यांची
हातात हात आमुचे, नाही कुणीही एकटे ।।

घेतली श्रमाची दीक्षा, श्रमाची बांधतो पूजा
हा उच्च हा नीच, असा भाव नसे मनी दूजा
मजेत जगतो आम्ही, जशी डोलणारी पाती ।।

स्वागत करतो नित्य, नूतन तंत्रज्ञानाचे
विलसते आमुच्या चेहऱ्यावर, हास्य अभिमानाचे
तुझ्याच चरणी आमचे जीवन, हे श्रममाते ।।

- मुबारक शेख
१६२/८ ब, आळंदकर चाळ, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१



हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० अग्रहायण, शके १९३५, १ डिसेंबर २०१३ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे -२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.
प्रायोजक - सौ. प्राची अमर परांजपे, सांगली.

छात्र प्रबोधन दिवाळी अंक २०१३
मान्यवरांच्या प्रतिक्रिया

स.न.वि.वि.

मा. महेन्द्र सेठियाजी, खरोखरच त्या दिवशी आपण माझ्या घरी आलात आणि मी भरून पावले. माझा आनंद व्यक्त करते.

ग्रामीण अंक, नागरी अंक आणि इतर सर्वच अंक उत्तम झाले आहेत. दर्जेदार कथा, ज्ञान–विज्ञान विषयक माहिती, कविता, ललित, गद्य हे सर्व साहित्य मुलांसाठी आनंदाचा अनुभव ठरेल. आपल्या 'छात्र प्रबोधन'च्या सर्व परिवाराला धन्यवाद देते, थांबते.

(लीला दीक्षित, पुणे)

सस्नेह नमस्कार,

छात्र प्रबोधन - २०१३ दीपावली विशेषांक नेहमीसारखाच दर्जेदार साहित्याने नटलेला आहे. वासुदेव कामतांच्या कुंचल्यातून साकारलेले मुखपृष्ठ तर लाजबाब! कुमारांच्या दृष्टीने हा अंक सर्वांगाने बहरलेला आहे. कुमारांसाठी काही पाने राखून ठेवलीत हेही उत्तम. आपल्या पुढील वाटचालीस शुभेच्छा!

आपला

— एकनाथ आव्हाड, मुंबई

स. नमस्कार,

छात्र प्रबोधनचा दिवाळी अंक मिळाला. गेल्या आठवड्यात पुण्याला आलो होतो. परंतु आपल्याला भेटणे झाले नाही. आमचेही इकडे कार्याचे क्षेत्र वाढले आहे. यामुळे वेळच मिळत नाही. शिक्षण घेणाऱ्या मुलींची संस्था वाढते आहे यामुळे त्यांचे रक्षण करणे, पालन–पोषण करणे ही एक जबाबदारीच आहे. कर्तव्य म्हणून केलेच पाहिजे. पुन्हा केव्हातरी पुण्याला येईन तेव्हा नक्की भेटेन. छात्र प्रबोधनच्या वाटचालीला शुभेच्छा!

(भीमराव गस्ती, बेळगाव)

स. नमस्कार,

'छात्र प्रबोधन'चा दिवाळी अंक मिळाला त्याबद्दल धन्यवाद.

अंकाची छपाई आणि सजावट, रेखाटणे आवडली. माझी कथा चांगल्या तऱ्हेने, टाईपमध्ये योग्य बदल व नेमके चित्र काढून छापली आहे. तळात दिलेल्या काव्यपंक्ती, लेख, कथांस अनुरूप बघून कमाल वाटली. संपूर्ण अंक वाचला नाही तरी लीला दीक्षितांचा लेख आवर्जून वाचला. फारच छान. समुद्राला, 'गायकामागचा तंबोरा' किंवा 'लहान मूल कोवळ्या उन्हात दुपट्यावर एकटेच खेळत असावे.' या कल्पना बहारीच्या आहेत. तूर्त एवढेच. ही दीपावली सुखाची, विकासाची ठरो ही सदिच्छा !

(विद्याधर म्हैसकर, कराड)

सस्नेह नमस्कार,

माहितीपूर्ण आणि देखण्या छात्र प्रबोधन दिवाळी अंकाबद्दल मन:पूर्वक अभिनंदन!

(मिलिंद संगोराम, पुणे)

स.न.वि.वि.

आशयसंपन्न आणि देखण्या अंकाबद्दल मनापासून अभिनंदन! छात्र प्रबोधनच्या आगामी वाटचालीला शुभेच्छा !

(डॉ. प्रदीप आवटे, पुणे)

सौर अग्रहायण, शके १९३५/डिसेंबर२०१३, पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
पंजीकरण क्रमांक (RNINO.)MAHMAR/2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001)
L-2 / RNP / PNW/M / 94 / 2012 - 2014, **Posting at S.P. Post Office On 1st of Every Month.**

देवी शारदा

महन्मंगले देवी शारदे! विद्यावरदायिनी
नमोस्तुते कल्याणी देवी! जगत्कलावर्धिनी ।।धृ.।।

जीवन व्हावे शिक्षित सुंदर, ही अमुची कामना
नमन तुझ्या चरणावर माते! विनम्रशी भावना
आशिष द्यावा माते आम्हा कृपावंत होवुनी ।।१।।

तूच तुकोबा गाथा अमुची! सुबोध ज्ञानेश्वरी
दासबोधही तूच शारदे! माता वागीश्वरी
नमो शारदे! चेतनशक्ती, नवोन्मेषशालिनी ।।२।।

जगतासाठी, तुझी प्रेरणा! बलिष्ट राहे सदा
तुझ्या कृपेने मिळते शक्ती, बुद्धीची संपदा
स्वीकारूनी वंदनास माते, ये सत्वर धावुनी
महन्मंगले देवी शारदे! विद्यावरदायिनी ।।३।।

– स. सो. सुतार
विश्वकर्मा भवन, खंडाराव नगर,
पिंप्राळे, जळगाव ४२५००३

सौर दिनदर्शिका
शके १९३५

	डिसेंबर २०१३	अग्रहायण पौष
र.	1	१०
सो.	2	११
मं.	3	१२
बु.	4	१३
गु.	5	१४
शु.	6	१५
श.	7	१६
र.	8	१७
सो.	9	१८
मं.	10	१९
बु.	11	२०
गु.	12	२१
शु.	13	२२
श.	14	२३
र.	15	२४
सो.	16	२५
मं.	17	२६
बु.	18	२७
गु.	19	२८
शु.	20	२९
श.	21	३०
र.	22	पौ.१
सो.	23	२
मं.	24	३
बु.	25	४
गु.	26	५
शु.	27	६
श.	28	७
र.	29	८
सो.	30	९
मं.	31	१०

**पत्त्यामध्ये चुका असल्यास अथवा
पिन कोड क्रमांक नसल्यास तातडीने कळवा.**

संपर्क पत्ता :
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
या अंकाची किंमत : ₹ १५/-
वार्षिक वर्गणी : ₹ १८०/-
प्रकाशन दिनांक :
सौर १० अग्रहायण, शके १९३५
१ डिसेंबर २०१३
www.chhatraprabodhan.org
ई-मेल : chhatraprabodhan@
jnanaprabodhini.org

प्रिय पोस्टमन,

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना!

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा–संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति –